

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)


## श्रीसाई वाक्सुधा


(वर्ष ६० वे) किंमत एक रुपया (अंक ३ रा)

जून १९८१

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

तात्पर्य बाबा दीनदयाळ ।
भक्त कल्याणालागी कनवाळ ।
अर्पीत बोधामृताचा सुकाळ ।
शिर्डीत त्रिकाळ तो परिसा ॥१४७॥


जयां माझी आवड मोठी ।
तयांचे मी अखंड दृष्टीं ।
तयां मजवीण ओस सृष्टी ।
माझियाच गोष्टी तयां मुखीं ॥१४८॥

तयां माझें अखंड ध्यान ।
जिव्हेसी माझेंच नामावर्तन ।
करूं जातां गमना गमन ।
चरित्र गायन माझें तयां ॥१४९॥

ऐसें होतां मदाकार ।
कर्मा कर्मी पडेल विसर ।
जेथें हा मत्सेवेचा आदर ।
तिष्ठें मी निरंतर तेथेंचि ॥१५०॥

मज होऊनि अनन्य-शरण ।
जया माझें अखंड स्मरण ।
तयांचे मज माथां ऋण ।
फेडीन उद्धरण करूनियां ॥१५१॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४४ वा



## श्रीसाईलीला

साठाव्या वर्षाचा खास गुरुपौर्णिमा अंक १ जुलै १९८१ रोजी थाटात प्रसिद्ध होईल.

मुखपृष्ठावर बाबांचे मनमोहक छायाचित्र.

173

# अनुक्रमणिका जून १९८१


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | — हा अनामिक प्रचार थांबवा |
| २) | डॉ. अरुणकुमार शिवलकर | — साईनंद |
| ३) | स्तोत्रे ! स्तोत्रे ! स्तोत्रे ! | — ले. क. मु. बा. निंबाळकर |
| ४) | सर्वेशात्मक शक्ती साई | — दा. र. दळवी |
| ५) | अन् तो म्हातारा पुन्हा दिसलाच नाही | — स्वामी संबयानंद |
| ६) | साई भक्तांच्या संख्येत वाढ | — रमेश चव्हाण |
| ७) | तुमचे बाबांबद्दलचे सामान्य ज्ञान किती आहे | — माधव गोरे |
| ८) | साईंचे कृपाछत्र | — दिलीप परदेसी |
| ९) | प्रभू रामाची भेट | — श्रीमती शहाणे |
| १०) | बाबांनी पहाटेस जागे केले | — सौ. देवकी सकपाळ |
| ११) | श्रद्धेचे फळ | — कु. सीमा गोलतकर |
| १२) | इच्छेसी देता आशिर्वाद | — सौ. सरोज निबंधे |
| १३) | साईकृपा | — ग. दे. कुलकर्णी |
| १४) | साईबाबा द मास्टर-परीक्षण | — अनिल रसाळ |
| १५) | साईबाबांची द्वारकामाई | — सदानंद चेंदवणकर |
| १६) | श्रद्धांजली | — संपादक |
| १७) | कोर्ट रिसिव्हर श्री. काकरे साहेब यांचा षष्ठ्यद्बिपूर्ती समारंभ | — साईनंद |
| १८) | बाबांची मानस पूजा | — जाधव मास्तर |
| १९) | ओ शिर्डीवाले बाबा | — सौ. चंद्राबेन शाटे |
| २०) | ओवाळणी | — सारंग ए. टी. |
| २१) | साई परिवार वृत्त विशेष | — |
| २२) | शिरडी वृत्त माहे एप्रिल ८१ | — |

# श्रीबाबांबद्दलचा अनामिक प्रचार थांबवा




आमच्या काही साईभक्त मित्रमंडळींना गेल्या काही महिन्यात काही अजब मजकुराची पत्रे आली आहेत. व आजही येत आहेत. पत्रात सुरुवातीला 'श्रीसाईबाबा प्रसन्न' असे ५-६ वेळा लिहिलेले आहे. व त्याखाली पत्रमालकाला उद्देशून पुढील मजकूर लिहिलेला आढळला. मला साईबाबा प्रसन्न झाले आहेत. तुम्हालाही ते होतील याच्याच सारखी सहा कार्डे लिहून ती आपल्या इष्टमित्रांना पाठवा म्हणजे मग तुम्हाला संपत्ती लाभ होईल. एका बाईने अशीच कार्डे पाठविली तिला सहाशे रुपये मिळाले. मात्र पत्रे लिहून न पाठविल्यास महान संकटात पडाल.

पत्राखाली अर्थातच सही नव्हती.

भक्तांनो, अशा मजकुराची पत्रे पाठविणाऱ्या या उपद्व्यापी गृहस्थाच्या मनात कोणता हेतू असेल हे काही निश्चित सांगू शकत नाही. कदाचित्‌ त्याला आपल्या भक्त मित्रांची टर उडवायची असेल. माणसाला फसविण्याची जी अनेक साधने या विसाव्या शतकात वापरली जातात. त्यातलेच हे एक साधन असू शकेल. पण सहा कार्डे लिहून नव्वद पैसे आणि लिहिण्याचे श्रम खर्ची घालण्याच्या त्याच्या उद्योगामागे जर साईबाबांच्या नावाचा प्रचार, प्रसार व्हावा असा हेतू असेल. साईबाबांवर जर त्याची श्रद्धा असेल तर हा मार्ग निवडताना तो खचित चुकीच्या मार्गाने गेला असेच म्हणावे लागेल.

मनुष्य हा श्रद्धावान प्राणी आहे. कशावर तरी तो श्रद्धा ठेवतो. त्या श्रद्धेच्या अनुषंगाने तो आपली बुद्धी, शक्ती आणि वेळ यांचा व्यय करतो. प्रत्येकाची कशावर तरी श्रद्धा ही असतेच. रानटी अवस्थेत माणसाची निसर्गाच्या उत्पातावर व पर्यायाने कुणातरी सामर्थ्यशाली शक्तीवर श्रद्धा होती. त्या शक्तीला त्याने वृक्ष, पर्वत, नद्या यांच्या ठिकाणी पाहिले ! त्याची तो आराधना करू लागला. पण जसजशी माणसाची बुद्धी प्रगल्भ होऊ लागली तसतसा तो त्या शक्तीला प्रतिमाचे रूप देऊन त्याची पूजा करू लागला. विसाव्या शतकात ध्येय हाच देव. त्याच्यावर मनुष्य

श्रद्धा ठेऊ लागला. देशाचे स्वातंत्र्य हेच ज्यांनी आपले ध्येय मानले, त्यांनी प्रसंगी आपल्या प्राणाचीही पर्वा केली नाही. त्यांनी हाल सोसले, तुरुंगवास भोगला, सिंहासनाकडे जाणाऱ्या राजपुत्राच्या अभिमानाने आपली मान उन्नत ठेऊन व 'वंदे मातरम्', 'भारतमाता की जय' असा जयघोष करीत वधस्तंभाकडे ते चालत गेले. त्यांच्या अंगी हे जे धैर्य आले, आपली जीवनपुष्पे त्यांनी ज्या सहजतेने भारतमातेच्या चरणावर वाहिली ते धैर्य त्यांना कुठून आले ? त्यांची ज्या ध्येयावर श्रद्धा होती, त्या श्रद्धेतूनच या सामर्थ्याचा उगम झाला. श्रद्धेची स्थाने जरी कालानुसार बदलली, तरी कशावर तरी श्रद्धा ठेवण्याची प्रवृत्ती नाही. बदलणार नाही किंवा नाहीशी होणार नाही. त्या प्रवृत्तीमुळेच मनुष्य जगतो, धडपडतो, प्रयत्न करतो. कुणाची देवावर श्रद्धा असेल, कुणाची आईबापावर, कुणाची धर्मावर, कुणाची पैशावर, कुणाची साधु-वैराग्यावर किंवा कुणाची एखाद्या जगत वंद्य व्यक्तीवर किंवा पुढाऱ्यावर असेल पण ती श्रद्धा प्रत्येकाच्या अंतःकरणात असतेच. आपली कशावरच श्रद्धा नाही. 'सब कुछ झूठ है !' असे म्हणणारा देखील हे विसरतो की तो जे आपली कशावरच श्रद्धा नाही असे म्हणतो, त्यावरच त्या भावनेवर, विचारावर त्याची श्रद्धा असते. म्हणूनच तो तसा वागतो.

आजपर्यंत जगात ज्या काही बऱ्यावाईट गोष्टी घडल्या आणि घडत आहेत त्या त्या सर्व श्रद्धेतूनच उगम पावल्या आहेत. जेव्हा माणसाची कशावर तरी श्रद्धा बसते, तेव्हा त्याला त्याखेरीज काहीच दिसत नाही. त्याच्यावरच तो आपले सारे लक्ष केंद्रीत करतो. त्यासाठी तो वावरतो, खपतो, कष्ट करतो. श्रद्धेमुळेच. मग ती कशावरही असो, डोळस असो वा आंधळी असो, माणूस काहीतरी करू शकतो. त्याच्या हातून त्याच्या उद्दिष्टाप्रमाणे बरेवाईट काही तरी होऊ शकते. असे नसते-तर तो निष्क्रीय झाला असता.

भक्त-मित्रांना अनाहूत पत्रे पाठविणाऱ्या त्या अनभिज्ञ व्यक्तीची श्रीसाईबाबांवर श्रद्धा असेल नाही असे नाही, पण त्याची बळजबरी त्याने इतरांवर का करावी. देवाने प्रसन्न होऊन दर्शन आणि इच्छित दिल्याचे दाखले आपण पुराणात वाचतो, स्वप्नात येऊन दृष्टांत दिल्याचेही आपण ऐकतो. पण मला साईबाबा प्रसन्न झाले आहेत, असे भारतातल्या कुठल्या जरी भागात राहून हा अनामिक इतर भक्तांना, मित्रांना परिचिताना अपरिचिताना का कळवतोय ! साईबाबांचा हा देवदूत असा गुप्त का राहू इच्छितो. त्याने जी इतराना पत्रे पाठविली असतील त्यांची श्री बाबांच्याबद्दलची काय समजूत झाली असेल ! निनावी पत्रे पाठविल्यामुळे त्यांना काय वाटले असेल याचा या उपद्व्यापी माणसाने कधी विचार केला आहे काय ?


श्रीसाईबाबा या युगात हे एक महान संत होऊन गेले यात वादच नाही. प्रत्येक युगात अशी कुणीतरी पूज्य व्यक्ती जन्मास येते, तिच्या प्रभावाची आणि सामर्थ्याची प्रचिती पटलेले आणि ऐकलेले भाविक तिचे अनुयायी बनतात. बाबांचे हे अनुयायी आहेत दरवर्षीच नव्हे तर हरहमेशा मनात आणले की शिरडीची यात्रा करणारे अनेक भाविक आम्ही पाहिले आहेत. अनेक सुशिक्षित बाबांचे भक्त आम्हाला ज्ञात आहेत. ज्ञानेश्वरी प्रमाणेच साई चरित्राचे अखंड किंवा साप्ताहिक वाचन झालेले आम्ही पाहिलेले आहे. साई महात्म्याची पारायणेही मोठ्या श्रद्धेने केली जातात हे पण आम्ही बघितले आहे. प्रख्यात चित्रकारांच्या कुंचल्यातून उतरलेली बाबांची मुखपृष्ठे व पुस्तके बुक डेपोतून आम्ही अवलोकिली आहेत. या श्रद्धेचा अर्थ कळू शकतो. माणसाच्या अंतःकरणातील ती एक प्रवृत्ती आहे. पण हा अनामिक प्रचाराचा मार्ग स्वीकारणारा हा उपदव्यापी चमत्कारीक बिनडोक भक्त आणि त्याची प्रचाराची ही पद्धती त्याला नसेल पण साईबाबा विषयक लोकमताला वाईट ठरणार नाही काय ?

पत्रे पाठविणाऱ्या भक्ताचा हेतू त्याच्या साईबाबा भक्तीचे प्रदर्शन हा असेल पण अशा रीतीने कुठल्या धर्माचा, तत्वाचा किंवा पंथाचा प्रसार झाला आहे काय ? माणूस जेव्हा अंधश्रद्ध असतो तेव्हा तो फसतो पण फसल्यावर आपण फसल्याप्रमाणे इतरांनाही फसविण्यात तो एक प्रकारचा आनंद मानतो, तसेच हे सारे काही आहे.

तेव्हा साईभक्त मित्रानो, श्रीबाबांविषयीच्या या अनामिक भक्ताच्या पत्रे लिहिण्याच्या अपप्रचाराला मुळीच वाव देऊ नकात. पत्रे आपल्या मित्राना अजिबात पाठवू नकात, त्याने लिहिलेल्या मजकूराला अजिबात घाबरू नकात. साईबाबा कुणाचेही कधीच वाईट करीत नाहीत, इच्छित पण नाहीत यावर शंभर टक्के विश्वास ठेवा, खात्री बाळगा आणि मित्रानो, असा अनामिक प्रचार करणारा मित्र जर आढळलाच तर त्याला म्हणा, बाबारे, अशा प्रकारची पत्रे कुणाला पाठवू नकोस त्याचा काही उपयोग नाही. तू पंधरा पैसे व लिहिण्याचे श्रम एवढी किंमत देऊन पत्रे पाठवलीस पण तू लिहिल्याप्रमाणे मी काही सहाकार्डे पाठविणार नाही. सहाशे रुपये अचानक मिळतील यावर तर माझा मुळीच विश्वास नाही. तुझे पंधरा पैसे व श्रम फुकट गेले आहेत. श्रीसाईबाबांचा भक्तीप्रचार अशा रीतीने होणार नाही, आणि तू पण तसा करू नकोस.

# सुविख्यात नेत्रविशारद- डॉ. अरुणकुमार शिवलकर

● साईनंद



शिरडीस आतापर्यंत लायन क्लबतर्फे तीन नेत्रशिबिरे भरविण्यात आली आणि या तिन्ही शिबिरात शिरडी व परिसरातील नेत्र रुग्णाइतांची विशेष सेवा मुंबापुरीतील एका तरुण नेत्र शस्त्रक्रिया विशारदाने केली त्यांचे नाव आहे डॉ. अरुणकुमार वसंतराव शिवलकर. बाबांवर संपूर्णपणे विश्वासुन डॉ. शिवलकर रुग्णाइतांची मनोभावे सेवाशुश्रुषा आजवर तरी यशस्वीपणे करीत आलेले आहेत.

साईभक्त डॉ. शिवलकर मूळ गोव्यातील शिवोलीचे. त्यांचा जन्म २३ मे १९३६ रोजी झाला. त्यांचे वडील श्री. वसंतराव मिलीटरीत इंजिनियर या पदावर होते. सेवानिवृत्ती नंतर ते आता बेळगावला स्थायिक झाले आहेत. डॉ. अरुण यांच्या मातोश्रींचे नाव कृष्णाबाई (वासंती) छोट्या अरुणचे अगदी सुरुवातीचे शिक्षण दादरच्या बालमोहन विद्यामंदीरमध्ये झाले. पुढे ते बेळगावच्या प्राथमिक मराठी शाळेत चौथीपर्यंत शिकले. नंतर पुण्याच्या मॉडर्न हायस्कूल मधून पुढील शिक्षणक्रम पूर्ण करून १९५२ साली ते एस. एस. सी. उत्तीर्ण झाले. इंग्रजी, गणित, शास्त्र या विषयात तर त्यांना ६० टक्क्याहून अधिक गुण मिळाले. नंतर विश्वविद्यालयीन अभ्यासासाठी त्यांनी पुण्याच्या एम. इ. एस. कॉलेजात प्रवेश केला व १९५६ साली ते प्राणी शास्त्र, वनस्पती शास्त्र व भूगर्भशास्त्र हे विषय घेऊन बी. एस.स्सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचा मेडीकल कॉलेजात जाण्याचा निश्चय होता पण प्रवेशच त्यांना इथे मिळाला नाही. म्हणून त्यांनी कलकत्ता येथील मेडीकल कॉलेजात प्रवेश मिळविला. तेथल्या राधा-गोविंद कार मेडीकल कॉलेजातून ते १९६३ साली एम. बी. बी. एस. उत्तीर्ण झाले. पुढे डोळयांचा त्यांनी विशेष अभ्यास केला व त्यातील प्रावीण्याची परीक्षापण त्यांनी यशस्वीपणे दिली.

पुढे नोव्हेंबर १९६३ मध्ये ते मुंबईला आले व शीव (सायन) येथील महापालिकेच्या इस्पितळात त्यांनी नोकरी पकडली. १९६६ च्या अखेरपर्यंत ते तिथे होते. पुढे त्यांचा विवाह मुंबापुरीतील अखिल भारतीय कीर्तीचे नेत्र तज्ज्ञ डॉ. बी. डी. तेलंग यांच्या सुकन्येशी २४ मे १९६७ साली झाला. सौ. विनोदीनी शिवलकर या बी. ए. असून एका शिक्षण संस्थेच्या वहातूक विभागाशी संबंधित आहेत. शिवलकर दंपत्तीना समीर आणि विक्रम असे दोन लहान पुत्र आहेत.

डॉ. शिवलकर लहानपणी त्यांचे वडील कोपरगाव येथे असताना १९५२ च्या एप्रिल महिन्यात शिरडीला अगदी प्रथमच गेले होते. त्यावेळी तिथे भिकाऱ्यांचे प्रमाण फार मोठे होते. १९५२ नंतर १९७९ साली नेत्र शिबिरानिमित्य शिरडीस जाणे झाले. तेव्हा त्यांना तेथला एकंदरीत कायापालट नजरेस आला. भिकाऱ्यांचे तेथले त्यावेळचे जंगी प्रमाण बघून येथे पुन्हा येणेच नको असे त्यांना त्यावेळी वाटले होते. परंतु पुन्हा जेव्हा ते गेले तेव्हा श्रीबाबांच्या दरबारात पुन्हा पुन्हा जावेसे वाटते असे ते म्हणतात. शिरडीला गेल्याने मला मानसिक शांतता मिळते असेही ते सांगतात.

लग्नानंतर डॉ. शिवलकर आपले सासरे डॉ. तेलंग यांच्याच बरोबर त्यांच्या नेत्र इस्पितळात व कनसलटिंग रूमवर त्यांना सहाय्य करीत असत पण पुढे त्यांनी श्रीसाईबाबांना आपल्याला दादरला स्वतंत्र व्यवसायासाठी जागा मिळावी असे साकडेच घातले आणि काय आश्चर्य ! दोन तिन महिन्यातच त्यांचा जागेचा प्रश्न सुटला आणि दादरलाच धुरुटेरेसमध्ये त्यांना जागा अगदी मोक्याच्या ठिकाणी मिळाली. तेव्हापासून तर डॉ. शिवलकर श्रीबाबांना आणखीन मानू लागले. दर गुरुवारी ते अगदी काही एक न घेता संपूर्ण उपास करतात. सायंकाळी घरी गेल्यावर पुन्हा स्नान करतात आणि बाबांच्या १०८ नावाचे स्मरण करतात. बाबांशिवाय आपल्या अंतः करणात आता दुसऱ्या दैवताला स्थान नाही. बाबाच आपले सर्वस्व आहेत. प्रत्येक शस्त्रक्रिया करण्यापूर्वी आपण क्षणभर बाबांचे नामस्मरण करतो आणि हमखास आपल्याला गुण येतो व शस्त्रक्रिया यशस्वी होते असे पुन्हा पुन्हा ते सांगतात. आपल्या दादरच्या दवाखान्यात गेल्यावरही सायंकाळी ते बाबांच्या तसबिरी समोर उदबत्ती लावतात आणि मगच रुग्णाइतांना तपासतात. बाबांशिवाय या जगात दुसरी कोणतीच मोठी शक्ती नाही असे त्यांचे आवर्जून सांगणे आहे.

# स्तोत्रे ! स्तोत्रे ! स्तोत्रे !

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर ( निवृत्त )
१।१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस
बंड गार्डन रोड, पुणे ४११००१

● स्तोत्र म्हणजे स्तुतीपर काव्य रचना. आपल्या वेदात, पुराणात व संत वाङ्मयात अशी कितीतरी स्तोत्रे आढळतात, व त्यातील बरीचशी तर अत्यंत लोकप्रिय होऊन अनेकांच्या रोजच्या पाठात म्हटली जातात.

त्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य कारण म्हणजे नवविधा भक्तीतील फक्त 'पादसेवन' व 'अर्चन' ही दोन सोडून बाकीची सात तऱ्हेची भक्ती एका स्तोत्राने साधते हेच असावे असे मला वाटते. स्तोत्र मोठ्याने म्हटले जाते व ऐकलेही जाते म्हणजे 'श्रवण' व 'कीर्तन' आले व एकाग्रतेने म्हटले म्हणजे 'स्मरण'ही झालेच. बहुतेक स्तोत्रात इष्टदेवतेला नमन म्हणजे 'वंदन' असतेच. शेवटी दास्य 'सख्य' व 'आत्मनिवेदन' या भावना स्तुती करताना प्रदर्शित केल्या जातातच ना !

दुसरे लोकप्रियतेचे कारण म्हणजे स्तोत्रांची फलश्रुती. प्रत्येक स्तोत्राचे शेवटी किंवा आधीही स्तोत्र म्हटल्यामुळे मिळणाऱ्या फलांचे वर्णन दिलेले असते. ते वाचून या फलांच्या आशेने बरेच भक्त स्तोत्रांकडे ओढले जातात.

आणखी म्हणजे बहुधा स्तोत्रे फार मोठी नसतात व पाठही लवकर होतात. त्यामुळे या घाईगर्दीच्या काळात इतर दीर्घ पोथ्या वाचण्यापेक्षा ही सोईस्कर पडतात.

काही प्रसिद्ध व लोकप्रिय मराठी व संस्कृत भाषेतील स्तोत्रांचा परिचय या लेखात खाली देत आहे.

## १) श्री संकटनाशन स्तोत्र

नारद पुराणातले हे स्तोत्र श्री गणेशाला उद्देशून आहे. संस्कृत भाषेतील हे अगदी सोपे व लहानसे ( ८ श्लोकांचे ) स्तोत्र असून सर्व कार्यात यश प्राप्त होण्यासाठी व सर्व विघ्ने दूर होण्यासाठी हे म्हटले जाते.

## २) श्री महागणपत्यथर्वशीर्षम्

गणेश भक्तात हे संस्कृत स्तोत्र फार प्रचलित आहे. हे मंत्रमय असून शेकडो भारतीयांच्या नित्य पाठात आहे. या स्तोत्राने श्री गजाननास अभिषेक करण्याचाही प्रघात आहे. याची फलश्रुती मोठी असून स्तोत्रातच शेवटी दिलेली आहे. याच्या पठनाने सर्व काही लाभते असे म्हटले आहे.

## ३) श्री रामरक्षा स्तोत्र

बुधकौशिक ऋषींनी रचलेल्या या स्तोत्राचा आशय साक्षात् भगवान शंकरानी त्यांना स्वप्नात सांगितला असे म्हणतात. हे संस्कृत भाषेत असून याचे ३८ मंत्रमय श्लोक आहेत. हे सर्व संरक्षक असल्याने फार प्रचलित आहेत.

## ४) श्री व्यंकटेश स्तोत्र

हे १०८ ओव्यांचे मराठी भाषेतील स्तोत्र देवीदास या चैतन्यसंप्रदायी पुरुषाने अलिकडेच म्हणजे १७ व्या शतकाच्या आसपास लिहिलेले आहे व महाराष्ट्रातील हे एक अत्यंत प्रभावी स्तोत्र समजले जाते. या स्तोत्राचा उपयोग संसारी जीवांसाठी अधिक होतो. उदा. पुत्रप्राप्ती, धनप्राप्ती, असाध्य दुखणी बरी होणे वगैरे.

## ५) श्री विष्णुसहस्रनाम स्तोत्र

हे संस्कृत भाषेतील स्तोत्र भीष्म पितामहानी युधिष्ठिराला सांगितले आहे व महाभारतात अनुशासन पर्वात आलेले आहे. हे बरेचसे मोठे म्हणजे १४२ श्लोकांचे आहे. त्यात श्री विष्णूच्या एक हजार नावाचे श्लोक मात्र १०७ असून बाकींच्या श्लोकात प्रास्ताविक व फलश्रुती सांगितली आहे. हे स्तोत्र मोठे असले तरी म्हणायला सोपे आहे व लयबद्ध आहे. शिरडी येथे श्री साईबाबांच्या मंगल स्नानाचे वेळी हे म्हटले जाते. या स्तोत्राचे फल अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणूनच की काय श्री साईसच्चरित अध्याय २७ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे श्रीसाईबाबांनी एका रामदास्याची विष्णुसहस्रनामाची पोथी घेऊन ती बळेच शामाला आपल्या लाडक्या भक्ताला दिली व त्याला पाठ करण्यास सांगितली. कै. दासगणू महाराज व स्वर्गीय श्री राधाकृष्ण स्वामी यांचा हे स्तोत्र रोज म्हणण्याचा नियम होता.

## ६) भीमरुपी ( मारुती ) स्तोत्र

हे पंधरा श्लोकी मराठी भाषेतील स्तोत्र श्री रामदास स्वामींनी रचलेले असून या स्तोत्राची एकदा सिद्धता झाली म्हणजे आर्थिक, मानसिक व देहिक बल प्राप्त

होते. हे स्तोत्र दररोज सूर्योदयापूर्वी म्हणण्याचा प्रघात ठेवला तर मनुष्य निर्भय व विद्यावान् होतो म्हणून विद्यार्थ्यांनी हे जरूर म्हणावे.

शनीची साडेसाती असलेल्या व्यक्तींनी हे स्तोत्र नियमाने म्हटले तर त्यांची बरीच पीडा वाचते असे म्हणतात. कारण शनीला न भिणारी व शनीला ज्याचा धाक आहे अशी एकच देवता आहे ती म्हणजे मारुती.

### ७) श्री दत्तात्रेय स्तोत्र

हे संस्कृत भाषेतील स्तोत्र देवर्षि नारदानी रचलेले आहे. हे केवळ १८ श्लोकांचे आहे, परंतु परिणाम मात्र फार मोठा आहे. विशेषकरून पारमार्थिक लाभ फार होतो–स्तोत्रातच म्हटले आहे की हे दत्तात्रेयांचे साक्षात् दर्शन घडविणारे आहे. त्याचप्रमाणे काही ऐहिक लाभही या स्तोत्राच्या पठणाने साधतात–उदा० रागीटपणा कमी होणे, रोग बरे होणे, शत्रूंचा नाश होणे वगैरे.

### ८) श्री शिवमहिम्न स्तोत्रम्

हे स्तोत्र पुष्पदंत नावाच्या एका गंधर्व राजाने रचिले असे मानण्यात येते. हे संस्कृत भाषेत असून याचे एकूण श्लोक ४३ आहेत त्यातील ३१ श्लोक शिवस्तुतीचे असून त्या पुढील श्लोकात स्तोत्राचे माहात्म्य व फलश्रुती सांगितली आहे. काही ठिकाणी जरा उच्चारास कठीण अशी शब्दरचना असली तरी त्या शब्दांचा नीट उच्चार केला की मुख्यतः शिखरिणी छंदातील हे श्लोक अत्यंत कर्णमधूर वाटतात. ह्या स्तोत्राचा श्री शंकराच्या नित्य व नैमित्तिक अभिषेकासाठीही उपयोग केला जातो हे शिव भक्तांचे अत्यंत आवडते स्तोत्र आहे.

### ९) श्री शिवस्तुती

३१ ओव्यांचे ‘ तुजवीण शंभो मज कोण तारी ’ या ध्रुपदाचे मराठी भाषेतील हे स्तोत्र म्हणायला फार सोपे व तालबद्ध आहे. संस्कृत भाषेतील स्तोत्र म्हणायला ज्यांना अवघड वाटत असेल त्याना हे स्तोत्र सहज म्हणायला जमते व पाठही करता येते.

### १०) श्री आदित्यहृदय स्तोत्र

सूर्याची स्तुती करणारे व सूर्यापासून अमोघ फल देणारे हे स्तोत्र वाल्मिकी रामायणाच्या युद्धकाण्डात १७५ व्या अध्यायात आलेले असून श्री अगस्ती ऋषींनी

श्री रामाला रावणाविरुद्ध विजय प्राप्त होण्यासाठी सांगितलेले आहे. ह्या २३ श्लोकांच्या स्तोत्रात त्याची फलश्रुती पहिल्या २ श्लोकातच सांगितली आहे. हे संस्कृत भाषेत असले तरी म्हणायला फारसे अवघड नाही. हे स्तोत्र रोज तीन वेळा म्हणावयाचे आहे.

### ११) श्री सूर्यकवच

हे फक्त ७ श्लोकांचे स्तोत्र आरोग्यासाठी व शरीर संरक्षणासाठी म्हटले जाते. या स्तोत्राचे कर्ते याज्ञवल्क्य यांनी सूर्याची प्रचंड उपासना केली होती व सूर्याला प्रसन्न करून त्याजकडून यजुर्वेद नीट समजावून घेतला होता.

### १२) श्री सूक्त

श्री म्हणजे लक्ष्मी. तिच्या स्तुतीचे हे सूक्त ऋग्वेदातील परिशिष्ट सूक्तात आढळते. यातील पहिल्या १५ ऋचा एवढेच मुख्य सूक्त असून १६ वी ऋचा फलश्रुती दर्शक आहे. हे काम्यसूक्त म्हणून अधिक प्रसिद्ध आहे आणि श्रद्धावंतांच्या कसोटीलाही उतरले आहे. देवीच्या आराधनेत जप, अभिषेक, व हवन यासाठी या सूक्ताचा उपयोग केला जातो.

### १३) चर्पटपञ्जरिका स्तोत्र

आद्य श्री शंकराचार्य विरचित 'भज गोविंद भज गोविंद भज गोविंद मूढमते' या ध्रुपदाचे हे स्तोत्र १७ श्लोकांचे आहे. अद्वैत मताचे व निर्गुण उपासनेचे पुरस्कर्ते असूनही व वेदांत, उपनिषदे व गीतेवर भाष्य लिहिणारे मोठे ज्ञानी पुरुष असूनही त्यांनी निरनिराळ्या देवतांची भक्तीपर कितीतरी स्तोत्रे रचिली आहेत. जणुकाय त्यांना "उदंड अध्यात्मज्ञान–निरुपण। भक्तिविहीन फोल ॥" या उक्तीची सिद्धता प्रदर्शित करावयाची होती !!

हे स्तोत्र तसे स्तुतीपर नसून उपदेशपर आहे. परंतु ते शब्द लालित्यामुळे म्हणायला इतके छान आहे, अर्थाने इतके सुंदर आहे, व त्यातील उपदेश संसारी जीवाला इतका महत्वाचा आहे की त्याचा येथे मला उल्लेख करणे अत्यंत जरूरीचे वाटले.

### १४) श्री साईनाथमहिम्न स्तोत्रम्

हे १७ पद्यांचे संस्कृत भाषेतील स्तोत्र साकोरीच्या उपासनी महाराजांनी रचले आहे व फारच सुंदर अर्थाने भरलेले आहे. हे शिरडी येथे रोज दुपारच्या व धूप

आरतीच्या वेळी तसेच साकोरी येथे देखील थोडासा फरक करून म्हटले जाते. या स्तोत्राबद्दलचा मराठी अनुवादासह माझा लेख श्रीसाईलीलेच्या जानेवारी १९८१ च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे.

## १५) श्री साईनाथ स्तवनमंजरी

ह. भ. प. श्री दासगणूकृत हे १६३ ओव्यांचे स्तोत्र साईभक्तांचे आवडते आहे, व कित्येकांना त्याच्या पठणाची फलप्राप्तीही झालेली आहे. हे रोज वाचता आले तर उत्तमच नाहीतर दर गुरुवारी किंवा प्रत्येक एकादशीस तरी वाचावे. यातील प्रार्थनाष्टक (१२४–१३१) तर फारच सुंदर अर्थाचे आहे व अनेक साईभक्तांच्या तोंडपाठ आहे.

## १६) श्री नवग्रह स्तोत्र

श्री व्यासांनी रचलेले हे १२ श्लोकांचे स्तोत्र रोज म्हटल्याने सर्वच ग्रहांची शांती होते व सर्व ग्रहांच्या पीडा असल्यास टळतात अशी फलश्रुती आहे.

## १७) श्री शनिस्तोत्रम्

हे ११ श्लोकांचे स्तोत्र शनीच्या पीडेपासून वाचण्यास व खास करून साडे-साती असताना म्हणण्याचा प्रघात आहे.

## १८) ऋणमोचक मंगल स्तोत्र

मंगळाच्या स्तुतीचे हे १२ श्लोकांचे स्तोत्र भार्गव म्हणजे शुक्राचार्यांनी रचलेले असून स्कंद पुराणात आढळते. मंगळ ग्रहाच्या शांतीसाठी व खास करून धन प्राप्ती-साठी व ऋणाची फेड होण्यासाठी याचा उपयोग होतो.

वरील वर्णनावरून वाचकांना कल्पना येईल की आपल्या पूर्वजांनी किती तरी सुंदर व उपयोगी स्तोत्रे रचून ठेवलेली आहेत या स्तोत्रांच्या पोथ्या कुठल्याही धार्मिक पुस्तकांच्या दुकानात सहज व अगदी अल्प किंमतीत मिळतात. परंतु ही स्तोत्रे अर्थ समजून व ते म्हणण्याचे काही नियम असले तर ते पाळून म्हटली तर अधिक फलप्राप्ती होते. यासाठी वाचकांनी खालील पुस्तकांचा जरूर उपयोग करावा.

१) स्तोत्र परिमल : स. कृ. देवधर (प्रसाद प्रकाशन) किं. रु. ६-००
(प्रसिद्ध नऊ स्तोत्रांचे अर्थासह सुंदर विवरण)

२) श्री सूक्ष्म शिवमहिम्न स्तोत्र : श्री गजानन बाळकृष्ण दंडगे किं. रु. १·००
(महाराष्ट्र ग्रंथ भंडार, कोल्हापूर किं. रु. १·५०)

३) श्री विष्णुसहस्रनाम स्तोत्र : पं. श्रीपाद दा. सातवळेकर किं. रु. २·००
(स्वाध्याय मंडळ, पारडी, गुजरात)

या सर्व लेखकांनी स्तोत्रांचे भाषांतर दिलेच आहे एवढेच नाहीं तर प्रत्येक स्तोत्राचा इतिहास, आशय, फलश्रुती व म्हणण्याचा संपूर्ण विधीदेखील सविस्तरपणे देऊन आम्हांवर मोठे उपकार करून ठेवले आहेत. वाचकांनी जरूर लाभ घ्यावा व निदान एकादे तरी स्तोत्र पाठ करून रोज म्हणण्याचा संकल्प करावा म्हणजे हा लेख लिहिल्याचे सार्थक होईल.


॥ दत्तमहाराज प्रसन्न ॥

माझा जो जाहला काया वाचा मनी ।
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

सोन्याची शुद्धता आणि कलात्मक दागिने बनविणारी
माहिम भागातील विश्वासपात्र एकमेव पेढी म्हणजेच—

मे. शंकर हरी वैद्य (रत्नागिरीकर)
आणि कुष्टे ज्युवेलर्स

पाठारे मॅन्शन, ले. ज. रोड, माहिम, मुंबई—४०० ०१६.
फोन : ४६७०१८

(सिटीलाईट सिनेमा जवळ)

[बी. वाय. पी.]

# सर्वेशात्मक शक्ति श्रीसाई

—श्री. दा. र. दळवी
५।७८ बी. पी. टी. कॉलनी
रेनॉल्डस रोड वडाळा मुं. ३७

● वारकरी संप्रदायातील महाराष्ट्रातील थोर संत श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास तसेच चारी पीठांचे शंकराचार्य आणि वेदाला प्रामाण्य मानणारे श्री दयानंद सरस्वती, यांच्या शुद्ध परंपरेकडे अभ्यासपूर्ण दृष्टिने पाहिल्यास हे सर्व नवनाथांशी व त्यांच्या संप्रदायाशी थोडेफार संबंधित होते असेच दिसून येते. सनातनी मंडळीतल्या त्यावेळच्या अनेक संप्रदायात सम्मिलीत झालेल्या हिंदु व अहिंदु समाजात नाथ संप्रदायाची शिकवण विद्या यांचा समावेश असलेला आढळतो. नवनाथांनी अनेक चमत्कार केले. अन्य कोणत्याही पंथाच्या सिद्धांना तसे तेवढे चमत्कार करता आलेले नाहीत ही वस्तुस्थिती दिसून येते. नवनाथ भक्तिसार या ग्रंथात तर नवनाथांनी प्रत्यक्ष शंकर व विष्णु यांचाही पराभव केल्याची हकीकत आहे. अशा या नवनाथांची परंपरा श्रीसंतज्ञानेश्वरापर्यंत येऊन पोचली नव्हे तर पुढेही चालू राहीलेली होती असे आढळून येते.

आदिनाथ गुरु । सकल सिद्धांचा ।
मच्छिंद्र तयाचा । मुख्य शिष्य ॥
मच्छिंद्राने बोध । गोरक्षासि केला ।
गोरक्ष बोलला । गहिनीप्रती ॥
गहिनी प्रसादे । निवृत्ती दातार
ज्ञानदेव सार । चोजविले ॥

सातत्याने एक तप (बारा वर्षे) उग्र तपश्चर्या केल्यामुळे नऊही नाथांना सर्व सिद्धी प्राप्त झाल्या. तत्सम अनेक सिद्धी श्री साईनाथांनाही प्राप्त होत्या असेच त्यांनी केलेल्या अनेक चमत्कारांकडे सूक्ष्म दृष्टिने पाहिल्यास आढळून येते. श्रीसाईनाथांचा आणि नवनाथांचा व श्री गुरुदेव दत्त यांचा अत्यंत जवळचा संबंध होता का ?

नवनाथांचे गुरु हे भगवान शिवशंकर आहेत. श्री साईनाथ मग ही प्रत्यक्ष शिवशक्ति होती का ? श्रीसाईबाबांच्या शिरडी येथील समाधी मंदीराच्या द्वारी आजही नंदी त्यांच्याकडे मुख करून उभा आहे.

'उन्मयनीचे लावण्य, तुर्येचे तारुण्य' असे जीचे वर्णन श्री ज्ञानेश्वरांनी केले ती अनादि अगम्य चैतन्यमय आदिशक्ती श्री साईनाथांना निश्चीतपणे प्रसन्न होती. कुंडलीनीची कृपा लाभलेल्या साक्षात्कारी योग्याच्या ठिकाणी अगाध सामर्थ्य जे असते ते श्रीसाईबाबांजवळ होते. मग श्रीसाईनाथ आदिशक्तिचाच अवतार होता का!

श्री शंकराच्या गणांचे अधिपती म्हणून ज्यांना गणपती म्हणतात. सर्व कार्याच्या आरंभी ज्यांचे स्मरण करतात त्या, सर्वांना वंदनीय अशा श्री गणेशाचाच हा अवतार!

श्री दत्तगुरु, श्री शिवशंकर, श्री जगदंबा, श्री गणेश, व श्रीकृष्ण या सर्वांचीच सर्वेशात्मक शक्ति श्रीसाई होय. अनेक श्रेष्ठ भक्तांना याचा प्रत्यय आला आहे. तुम्ही कुठल्याही दैवताचे उपासक असा श्रीसाईनाथांकडे ध्यानयुक्त श्रद्धामय अंतकरणाने पाहील्यास तुमचे अराध्य दैवत तुमच्या समोर दिसू लागते. 'श्रीसाईगीतसुधा' या मी लिहीलेल्या काव्यात्मक पुस्तकाच्यावेळी मला याचा अनुभव आला आहे. श्री गणेश व आदिशक्ति श्री भवानीमाता यांचे अनेकवेळा दर्शन श्रीसाईबाबांच्या छोट्या फोटोकडे भावपूर्ण दृष्टिने पाहता पाहता मला घडले आहे. माझ्या वरील पुस्तकातील 'नमन' या प्रथम काव्यगीतातच मी याचा उल्लेख केला आहे. अनेक भक्तजनांना असे अनुभव आले आहेत. हे केवळ दृष्टिचे आभास आहेत असे काहींना वाटेल कदाचित! ज्यांना अध्यात्माचा, अतींद्र विश्वाचा, स्वप्नसृष्टिचा कसलाही गंध नाही त्यांना तस वाटणं स्वाभाविक आहे. परंतु या जगात अशा काही विचित्र, अद्‌भूत, अगम्य चमत्कारीक विस्मयकारक घटना घडतात की तो अनुभव प्रत्यक्ष आल्याशिवाय विश्वास बसत नाही.

जगात जेव्हा अन्याय माजतो, अनाचार सुरू होतो. कष्ट, दुःख, रोग, दारिद्र्य जाणवून करुणा भाकायची पाळी येते तेव्हा सत्पुरुष निर्माण होतात. सन्मार्ग दाखविण्यासाठी अवतार कार्य होते. मानवावरील आपत्ती सोडविण्यासाठी अजन्म अशी ही थोर दिव्य सर्वेशात्मक शक्ति भूतलावर अवतरली.

'सत्कर्म कर, परमेश्वरावर दृढ विश्वास ठेव व जीवनाचे सार्थक कर.' 'तुझेही काही कर्तव्य आहे ते कर आणि सुखी रहा व इतरांनाही सुखी कर.' श्रद्धा | सबुरी ठेऊनी माझ्याकडे पहा. तुला काहीही कमी पडणार नाही' अशा तऱ्हेचा साध्या, सोप्या शब्दात त्यांनी लोकांना उपदेश केला. अनेक चमत्कार करून लोकांचे लक्ष वेधले व त्यांची संकटातून मुक्तता केली. शिरडीला ही साईशक्ती प्रगटली आणि अणिमा गणिमा सारख्या सिद्धी त्यांच्या समोर निर्माण झाल्या. संतश्रेष्ठ श्रीसाईनाथांना समुद्रापलिकडचे दिसू शकत होते. आकाशाचा विचार त्यांना ऐकू येत होता. मुंगीचे पालीचे मनोगत त्यांना समजू शकले.

श्रीसाईबाबांनी चमत्कार केले ते सर्वसामान्य लोकांसाठी. सर्वसामान्य माणूस संतानी केलेल्या चमत्कारामुळेच त्यांना जाणतो. चमत्कार त्यांच्या मनात ठसून रहातात. संतांचे अद्वैत अध्यात्म्य किंबा साक्षात्कार म्हणा या गोष्टी सामान्य व्यक्तींच्या डोक्यावरून जातात म्हणून चमत्काराचा जवळचा उपाय संत काहीवेळा शोधतात काही ठराविक विशिष्ट मर्यादेपर्यंतच बुद्धीचा उपयोग करून, श्रद्धा, विश्वास, निष्ठा भावच आपणास अंतरीच्या वाटचालीला सहाय्यभूत ठरतात. हे साध्यासोप्या शब्दात श्रीसाईबाबांनी भक्तांना सांगितले. आज श्री साईनाथांच्या निर्वाणाला बासष्ट वर्षे उलटून गेली तरी सर्वेशात्मक ही थोर शक्ती शिरडीला अधिकाधिक हजारो-लाखो भक्तांना आज प्रेरणा देत आहे.

# ....अन् तो म्हातारा पुन्हा दिसलाच नाही

श्री स्वामी संजयानंद
बद्रीनाथ ( हिमालय )

● सन १९७५ चे साल. मे महिन्याची गोष्ट. त्यावेळी आम्ही पती-पत्नी शिरडी साई संस्थान भोजनगृहात जेवत नव्हतो, भाटिया लॉजमध्ये जेवत होतो. बाबांच्या भोजनगृहात भोजन पदार्थात मिर्ची अतिशय असायची व आम्ही पती-पत्नी मिर्ची अजिबात खात नव्हतो म्हणून आम्ही दोघे भोजनगृहात जेवण करीत नव्हतो.

गुरुवारचा दिवस होता. तारीख लक्षात नाही. दुपारच्या आरतीची वेळ होती. आम्ही आरतीला मंदिरातच बसलो होतो. थोड्या वेळाने आरती सुरू झाल्यावर मी पुरुषांच्या रांगेत जाऊन उभा राहिलो. माझ्या मागे एक म्हातारा पांढरी दाढी, डोक्याला कफनी व हातात दंडा घेतलेला उभा होता. त्याने माझ्या हाताला स्पर्श केला. मी मागे वळून पाहिले, तर त्याने हातानेच जेवणाचा इशारा मला केला. मी सांगितले की आरती झाल्यावर कूपन देतो. त्यावर तो गप्प बसला.

आरती संपली. मी मंदिराच्या बाहेर आलो. तो म्हातारा माझ्या पत्नीशी बोलत होता. मी माझ्या पत्नीला सांगितले की, ' मी याला जेवणाचे कूपन काढून देतो. तू येथे थांब.' परंतु तो म्हातारा माझ्या पत्नीला म्हणाला, ' की तूसुद्धा चल. ' म्हणून

आम्ही तिघे भोजनगृहात ( जुने भोजनगृह ) भोजनाचे कूपन घेण्यासाठी निघालो. तिघांच्याही पायात चपला नव्हत्या. भोजनगृहाजवळ पोहोचताच तो म्हातारा पटकन कुपनाच्या रांगेत जाऊन उभा राहिला. मी व माझी पत्नी आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागलो. त्याने खिशातून एक लहानशी डायरी काढली व तो त्या डायरीची पाने चाळू लागला. प्रत्येक पानामागे ५ रु., १० रु. ची नोट ठेवलेली होती. मी माझ्या पत्नीला म्हणालो की, म्हाताऱ्याजवळ एवढे पैसे असून हा आपल्याजवळ कूपन का मागत होता हे मला काही कळले नाही.

तो म्हातारा कूपनाच्या रांगेत उभा होता म्हणून आम्ही गुरुस्थानात सावलीत जावून बसलो. म्हाताऱ्याने दोन कूपने काढली, व आम्हाला जवळ बोलाविले. आम्ही त्याच्या जवळ गेलो. तो ज्या ठिकाणी उभा होता तेथे आम्ही पण जावून उभे राहिलो. पण काय आश्चर्य आम्ही तिघे ज्या ठिकाणी उभे होतो, त्याठिकाणी कुठल्या प्रकारची सावली नव्हती व पाया खालची जमीन फरशी अतिशय तापली होती. आम्हाला पाय खाली ठेववत नव्हते, व आम्ही कधी उजवा पाय वर करीत होतो. तर कधी डावा पाय. इतके पायाला चटके बसत होते. पण तो म्हातारा त्याच ठिकाणी आपले दोन्ही पाय जमिनीवर ठेवून निश्चल उभा होता. कुठल्याही प्रकारची चुळबूळ न करता तो म्हातारा आम्हाला म्हणाला की "माझी इच्छा आहे की तुम्ही दोघे बाबांच्या भोजनगृहात भोजन करावे, म्हणून मी तुमच्यासाठी दोन कूपने आणली आहेत. तेव्हा तुम्ही माझ्या बरोबर भोजनाला चला. त्यावर मी त्या म्हाताऱ्याला म्हणालो की मी भोजन गृहात कधीच जेवत नाही कारण मी स्वतः कांदा, मिर्ची, लसूण खात नाही, व या तिन्ही वस्तू भोजनात असतात म्हणून आम्ही भोजनगृहात कधीच जेवत नाही.

यावर तो म्हातारा मला म्हणाला की पण मला असे वाटते की तुम्ही आज भोजनगृहात जेवावे आम्ही त्याला प्रेमळपणाने विनवून नकार दिला. यावर तो म्हातारा आमच्यावर रागावला व आम्हाला म्हणाला की तुम्ही मला दरबारात भेटा मी तेथे तुम्हाला पहातो. असे म्हणून म्हातारा निघून गेला.

नंतर आम्ही दोघे भाटिया लॉजमध्ये जेवावयास गेलो. तेथे छोटू भाई भाटिया आम्हाला म्हणाले की, बाबा तुम्ही आज उशीरा आले. आता तुमचा नंबर लवकर लागणार नाही. तेव्हा मी पत्नीला म्हणालो की आपण दरबारात जाऊन त्या म्हाताऱ्याला भेटू. व आम्ही लगेच दरबारात आलो. व पुजाऱ्यांना त्या म्हाताऱ्याचे वर्णन करून विचारले, असा म्हातारा दरबारात दिसला का ? तर ते पुजारी म्हणाले की, तुम्ही सांगता त्या प्रकारचा म्हातारा 'साईबाबा' शिवाय कोणीच नाही व बाबा समोर बसले आहेत.

नंतर आम्ही पूर्ण शिर्डी पालथी घातली पण तो म्हातारा दिसला नाही. निराश होऊन परत दरबारात बाबांकडे आलो. तर लागलीच आमच्या डोक्यात प्रकाश पडला की तो म्हातारा म्हणजे स्वतः बाबाच होते व आम्हाला स्वतःच्या भोजनगृहात जेवणाचे निमंत्रण दिले होते.

त्यानंतर आजपासून मी भोजनगृह सोडून कुठेच काहीही खात नाही. भोजनगृहात आता मिर्ची, कांदा, लसूण कमी प्रमाणात वापरतात. ★

# साईभक्तांच्या संख्येत वाढ शोधाची एक मीमांसा

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, दुसरा मजला गुजरलेन, नवापूर
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे पिन–४२५ ४१८

● साईबाबा हयात होते त्यावेळी त्यांचे जे भक्त होते त्यापेक्षाही आज त्यांच्या भक्तांची संख्या कितीतरी पटीने जास्त आहे. हा विचार जेव्हा माझ्या मनात येतो तेव्हा मी कारणे शोधू लागतो. साईबाबांची भक्ती करा अशी कुणीच सक्ती करत नाही. आपोआप स्वयंस्फूर्तीने बाबांकडे खेचले जातात हे सत्य नाकारून चालणार नाही.

साईबाबांच्या जीवनलीलेतील गूढार्थ शोधल्यासच ह्याचे उत्तर मिळू शकेल. बाबांचा अवतार मानवजातीच्या कल्याणासाठीच झालेला होता. बाबा आपल्या भक्तांना नेहमी सांगत—

"तुमचा मी भार, वाहीन सर्वथा
नव्हे हे अन्यथा, वचन माझे।"

आणि समाधीनंतरही असेच अभयवचन दिलेले आहे.

"शिरडीस ज्याचे, लागतील पाय
टळती अपाय, सर्व त्याचे।
माझ्या समाधीची, पायरी चढेल

दुःख हे हरेल, सर्व त्याचे ।
जरी हे शरीर, गेलो मी टाकून
तरी मी धावेन, भक्तांसाठी ।
नवसासी माझी, पावेल समाधी
धरा दृढ बुद्धी, माझ्या ठायी ।
नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य
नित्य घ्या प्रचीत, अनुभवे ।"

बाबांची ही वचने म्हणजे प्रत्यक्ष भगवंताची वचने होत. बाबांकडे जो जो गेला त्याला या वचनांची अनुभुती आल्याशिवाय रहात नाही. मात्र आपण बाबांवरची श्रद्धा ढळू देता कामा नये. दुःखाच्यावेळी, संकटाच्या वेळी सुद्धा गांगरून जाता कामा नये. अशावेळी माझा एक शेर आठवतो तो असा—

"दुःख संकटे आलीत जरी
करू नका कधीच फिकीर
ठेवा अंतरी श्रद्धा, सबुरी
आपोआप निवारील शिरडीचा फकीर"

असे हे फकीर वेषातील साई सर्वांना आपले वाटतात. बाह्यात्कारी साधे दिसणारे बाबा त्रिकालज्ञानी होते. चांदभाई नावाच्या माणसाचे घोडे हरवले होते. बराच शोध घेऊनही ते सापडत नव्हते. योगायोगाने शोध घेताना ते बाबा बसले होते तेथे आले. त्यांनी बाबांना विचारले, "माझे घोडे हरवले आहेत, ते दिसले का ?" त्यावर बाबा म्हणाले, "तुझे घोडे जवळच्या शेतातच आहेत जा घेऊन ये.' आणि खरोखरच चांदभाई काही अंतर चालल्यावर घोडे चरत असताना दिसले.

हा प्रकार त्रिकालज्ञानी शिवाय कोण जाणू शकतो. भूत-वर्तमान व भविष्य त्यांना कळत असे. अशा विलक्षण सिद्धी बाबांना प्राप्त होत्या.. बाबा हयात असताना त्यांनी असंख्य अलौकिक चमत्कार करून भक्तांना थक्क करून सोडले. त्य चमत्कारांचा प्रत्यक्ष अनुभव लाभल्यामुळे भक्तांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा बसली. आजसुद्धा त्यांनी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीतील उदीचा प्रभाव काय सांगावा ! सर्व दुःखांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य उदीत असल्याची श्रद्धा सर्वत्र दिसून येत आहे, आणि म्हणूनच भक्तांची संख्या कितीतरी पटीने वाढत आहे.

शिरडीला जाऊन समाधी मंदिरातील बाबांची मूर्ती पाहून भक्त आनंदून जातात. बाबांची समाधी नवसास पावते या बाबतीत सुद्धा अनेक भक्तांचे अनुभव देता येतील. फक्त अनन्यभावाने प्रार्थना करायचाच उशीर कारण—

"शरण मज आला, आणि वाया गेला
दाखवा दाखला, ऐसा कोणी।"
तसेच—

"जाणा येथे आहे, सहाय्य सर्वांस
मागे जे जे त्यांसी, ते ते लाभे।"

म्हणूनच भक्त आपल्या इच्छापूर्तीसाठी शिरडीस गर्दी करीत असतात. शिरडीस बाबांची द्वारकामाई आहे. या द्वारकामाईबद्दल बाबांनी बाळासाहेब मिरीकरास सांगितले.

"हीच आपुली द्वारकामाता।
मशिदीचे या अंकी बैसता।
लेकुरां देई ती निर्भयता।
चिंतेची वार्ता नुरेचि ॥ ४८ ॥
मोठी कृपाळू ही मशीद माई।
भोळ्या भाविकांची ही आई।
कोणी कसाही पडो अपायी।
करील ही ठायींच रक्षण ॥ ४९ ॥
एकदा हिचे जो अंकी बैसला।
बेडा तयाचा पार पडला।
साउलीत हिचे जो पहुडला।
तो आरूढला सुखासनी ॥ ५० ॥

(श्रीसाईसच्चरित)

भोळया भक्तांची अशी ही मशीदमाई अर्थात द्वारकामाई प्रत्यक्ष आईच असल्याने, लेकरे धाव न घेतील तरच नवल!

साईबाबांनी इतर महात्म्यांनी जे सांगितले तेच सांगितले या उपरांत साईबाबांचे वेगळेपण दिसते ते त्यांच्या धर्मसमन्वयाच्या पुरस्कारात! धर्माचा अर्थ जर

मानवाचे परम कल्याण असाच असेल तर सर्व धर्म एकच आहेत असे बाबा म्हणत. आज बाबांच्या मंदिरात, द्वारकामाईत कसले दृश्य दिसते ? हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, गुजराथी, मारवाडी, मद्रासी, बंगाली, महाराष्ट्रीय भारतातील साऱ्या जातीचे आणि जमातीचे अनेक भाषा बोलणारे आणि साऱ्या थरातले भक्त एक दिलाने बाबांची भक्ती करताना पाहायला मिळते. सर्वांना एका सूत्रात गोवून त्यांच्यात बंधुभाव निर्माण करण्याचे महान कार्य बाबांनी केले आणि म्हणूनच शिरडीला गर्दी होण्याचे हे एक कारण असू शकेल.

श्री साईबाबांच्या भक्तीभावाने असंख्य मानवांच्या हृदयात एव विराट शक्ती निर्माण झाली आहे. हे मात्र तितकेच खरे ! म्हणून पुन्हा माझी ' साईबाबांचे नाव ' ही कविता आठवते ती अशी—

" हरएक अंतरात...हरएक प्रांतात
साईबाबांचे नाव झाले आहे फार...
घरात...दारात...इथून तिथे
जो तो भजतो आहे, जाणून चमत्कार...
सकाम...निष्काम भाव ठेवणारे
तसे अनेकजण आहेत भक्त...
आणि बाबांचंच सांगायचं झालं तर—
भक्तांची खबरदारी घ्यायला आहेत सक्त ! "

☆

## श्री. उज्ज्वल कुलकर्णी यांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन

साईलीलाचे एक लेखक—कवी श्री. उज्ज्वल वामनराव कुलकर्णी यांच्या महाराष्ट्र शासनाने अनुदान दिलेल्या व शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या ' दृष्ट ' या कथा संग्रहाचा प्रकाशन समारंभ १९–४–८१ रोजी लोकमान्य टिळक वाचनालय नंदुरबार येथे श्री. भास्करराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. या प्रसंगी सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ह. मो. मराठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. कुलकर्णी यांचे अभिनंदन.

# श्रीसाईंचे कृपाछत्र

—श्री. दिलीप माणीकसिंग परदेशी
राममंदीर जवळ, परदेशी पूरा
नंदुरबार जि. धुळे.

● माझी साईबाबांवर फार श्रद्धा आहे. साईकृपेने असाध्य गोष्टी सहजा सहजी साध्य झाल्याचा अनुभव मला वेळोवेळी साईकृपेने मिळाला आहे. साईबाबा माझ्या पाठीशी सावलीसारखे असतात. संकटे आली तरी ज्याप्रमाणे ती आलीत अगदी नकळत बाबांच्या कृपाप्रसादाने ती सहजगत्या दूर झालीत यावाबत उदाहरणे पुष्कळ आहेत. पैकी बाबांच्या लीलेबाबत व भक्तांच्या पाठीशी व त्यांच्या हाकेला बाबा कसे धावून येतात. त्याचं एक उदाहरण मी देत आहे.

ता. ३१–१२–८० रोजी रात्री आम्हा सर्वांचे जेवण आटोपल्या नंतर मी थोडा वेळ वर्तमान पत्र वाचीत होतो. तद्नंतर साईलीला नोव्हेंबर दिवाळी अंकातील बाबांच्या बाबतीत भक्तांना दिलेल्या सबूरी व श्रद्धा बाबतचे दाखले वाचीत होतो. दुसऱ्या खोलीत आई व लहान भाऊ झोपले होते. साईलीला मधील काही दाखले वाचून झाल्यानंतर मनोमन साईबाबांची प्रार्थना करून अंथरुणावर पडलो तोच दुसऱ्या खोलीत काचेची बाटली फुटावी तसा आवाज झाला. मी पटकन खोलीत जावून ट्यूबलाईट लावली पण ट्यूबलाईट लागली नाही. करीता ट्यूबलाईट कडे लक्ष वेधले तर तेथे ट्यूबलाईटच नाही. आवाजामुळे सर्वच जागे झाले नाईटलॅम्पच्या अंधूक प्रकाशात तेथील चित्र लक्षात आले. ज्या ठिकाणी आई व भाऊ झोपले होते. त्यांच्या डोक्यावरील खांबावरच ट्यूब लाईट अडकवली होती. व ती खाली पडली तर आमच्या अंदाजाने ती आई व भाऊ यांच्या डोक्याच्या भागावर पडली असती पण सदर ट्यूब लाईट त्यांच्या पासून १ ते १½ फुटावर पडली. ट्यूबच्या काचा चूर झाल्या पण काचेचा एक तुकडा देखील जमीनीवरील अंथरूणावर पडला नाही. क्षणभर आम्ही थक्कच झालो. आईला सांगितले मी थोड्यावेळापूर्वी साई-लीला अंक वाचीत होतो, व बाबांनीच हे येणारे संकट टाळले नाही पेक्षा काय इजा झाली असती त्याची कल्पना न केलेलीच बरी!

बाबांना सर्वांनी प्रार्थना पूर्वक नमस्कार करून आम्ही झोपलो. बाबा नेहमीच आमच्या कुटुंबीयांच्या मागे सावलीप्रमाणे रक्षणाकरीता असतात. बाबा असेच कृपा छत्र पाठीशी राहू द्यावे हीच त्यांच्या चरणी प्रार्थना... साईबाबांना माझे कोटी कोटी प्रणाम...

कौन छुयेगा उसकी परछाईरे।
जीसको बचाने वाला साई॥

# तुमचे श्री साईबाबांबद्दल सामान्यज्ञान किती आहे?

श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला ( पश्चिम ) मुंबई ४०००७०

१) ब्रह्मलोभी मारवाडी जेव्हा बाबांकडे गेला तेव्हा त्याच्या खिशात रु. ——— होते.
अ) ५० ब) २५० क) १०० ड) ५००

२) बाबांनी ———ला जामनेरला चांदोरकरांकडे उदी घेऊन पाठविले.
अ) शामा, ब) म्हाळसापती, क) बापूगीर, ड) मेघा

३) नारुग्रस्त पिल्ले यांच्या पायावर——— चा पाय पडला.
अ) अब्दुल्ला, ब) काशीराम, क) नूलकर, ड) रामचंद्र

४) श्री. साठ्यांच्या श्वशुरांचे नाव——— होते.
अ) खापर्डे, ब) मिटकर, क) दादासाहेब केळकर, ड) चांदोरकर

५) मेघा बाबांना——— मानीत असे.
अ) शंकर, ब) विष्णू, क) देवी, ड) विठ्ठल

६) रामदासी भजनी मेळा——— हून आला होता.
अ) नगर, ब) रहाता, क) मद्रास, ड) सोलापूर

७) बनता बनता बनेल असे बाबा——— म्हणाले.
अ) दीक्षितांना, ब) चांदोरकरांना, क) देव मामलेदारांना, ड) भाटेंना

८) विजयानंद संन्यासी——— येथे मरण पावला.
अ) मद्रास, ब) शिर्डी, क) कोपरगाव, ड) दिल्ली

९) शिर्डीला दर——— बाजार भरतो.
अ) सोमवारी, ब) रविवारी, क) शनिवार, ड) बुधवारी

१०) सिद्दीक फाळके——— चा रहिवासी होता.
अ) कल्याण, ब) नागपूर, क) हैद्राबाद, ड) ठाणे

उत्तरे : १) ब २) क ३) अ ४) क ५) अ ६) क ७) ब ८) ब ९) ब १०) अ

# प्रभू श्रीरामाची भेट

—श्रीमती श्री शहाणे
लक्ष्मीनिवास, गडकरी पथ डोंबिवली (पूर्व)

नाम घेता मुखी राघवाचे—दास रामाचा हनुमन्त नाचे ।

● श्रीरामाचे नाव घेऊन हनुमान नाचायला लागतो. कारण रामाच्या नावाचे महत्व खरं हनुमानालाच कळलेले असते. आपण नुसते म्हणतो—आपण आता नाम स्मरण करायचे. पण प्रत्यक्षात काय करतो आपणास माहित आहे ! अमक्या गोष्टीत राम आहे आणि तमक्या गोष्टीत राम नाही. खरं सांगायचे तर असं होतच नाही आणि होणेही शक्य नाही. अहो प्रत्येक गोष्टीत राम असतो. 'राम आकाशी पाताळी राम भरला चराचरी' हे आपले माझेच काव्य ! ते फारसे सुरेख नसेल. त्यातल भावच बघा म्हणजे झाले ! सांगायचे असे की प्रत्येक गोष्टीत असलेला राम आप त्याला समजलेला नसतो. आणि तो समजायला हवा असेल तर आपण त्या ती भावनेने त्याला ओळखायला हवा, त्यासाठी आपण आपल्या मुलावर, पतिवर ज प्रेम करतो तसेच प्रेम रामावर करायला हवे.

खरं तर राम तुमच्या हृदयातच आहे. आणि असे का म्हणते ठाऊ आहे ! आपण समाजात, नातेवाईकात, घरातल्या माणसात वागताना आपली भावन कोणत्या प्रकारची असते. सर्वांशी समभावाची असायला हवी तशी असणे म्हणजे तुमच्या हृदयात रामाचा वास असल्याची साक्ष आहे. मग राम तुम्हाला दूर नाही तो तुमच्या मुलात, पतित देखील दिसायला लागेल. कसा ते पाहा ! प्रत्येकाची सेव ही रामाची सेवा ! ह्या सेवेत मला राम पाहायचा आहे! मग स्वतःची मुलेबाळे, पति शेजारी किंवा आणिक कोणी असो, अशा विचारानी जर आपल्याला भोवतालच्यांच सेवा करण्याची भावना ठेवली तर नक्की तुम्हाला राम दूर नाही. अर्थात नुसत कोणाची सेवा करायला तुम्हाला कोणी सांगितले तर, तुम्हीही माणूस आहात तुम्हाला वाटले होते काय ह्याना उठसूठ ह्या धावपळीच्या जगात दुसऱ्याची सेव करायला सांगायला ! आपले घरचेच होताना मारामार ! तिथे दुसऱ्या कोणा म्हणून सेवा करायची ? हे तुमचे म्हणणे खोटे आहे असे मी म्हणणार नाही. प सेवा करण्यातही प्रकार आहेत ! त्यासाठी काही मी तुम्हाला अमक्याचे पाय चेप किंवा तमक्याची सुश्रुषा करा असं म्हणत नाही.

पण समजा एखाद्या बाईला कुठे जायचंय—तिच्या नवऱ्यासाठी हॉस्पिटल-मध्येच म्हणा—तर दुपारी तिनेच करून ठेवलेले तिच्या मुलाचे खाणेपिणे, शाळेतून आल्यावर कपडे बदलणे, तिच्याकडे येणाऱ्या पाहुण्याला योग्य निरोप योग्य शब्दात देणे अथवा त्याचा निरोप तिला देणे! ('नाहीतर कोण तुम्ही? हे ना नेहमीच बाहेर भटकत असतात आम्ही काय त्यांचे नोकर लागून गेलो नाही') अशा तऱ्हेची उत्तरे देण्यापेक्षा तुम्ही विचारा—कोण आले होते म्हणून सांगू? नाहीतर असंच करा ना! हा कागद अन् पेन घ्या आणि त्यावर नाव गाव, काम लिहून ठेवा. मी आठवणीने त्यांना आल्यावर देईन हं! पाहा तो माणूस किती खूष होईल. त्याला चहा नाही तरी पाणी विचारायला काहीच हरकत नाही. आपण अशा प्रकारे कुठे गेलो आणि ती व्यक्ति घरी नसली तर आपल्याला देखील तिच्या शेजारच्या कडून अशी वागणूक मिळावी अशी आपली अपेक्षा असते, आणि ती मिळाली की आपल्याला किती बरं वाटते. ही सेवा म्हणजेसुद्धा रामाचीच सेवा, राम! राम! तो तो काय आणखी कुठचा दूरचा उठून येणार आहे. तो तुमच्या हृदयातच आहे. तो व्यक्तीच्या कृतितच असतो, आणि कृतितूनच प्रगट होतो.

हा पुरावा दिसायला गरीबी श्रीमंती काही आड येत नाही. ह्या साध्या माणुसकीच्या गोष्टी आहेत. अर्थात त्या केलेल्याची जाणीव ठेवणे ही माणूसकी मात्र हवी! त्यासाठी शिक्षण हवे असेही नाही. पण संस्कार मात्र जरूर हवेत. त्या खेरीज हे घडणार नाही. संस्काराने संस्कृति घडते. संस्काराने धर्म बनलेला असतो! संस्कारानेच तो टिकविता येतो. त्यासाठी जातीचे बंधन असण्याची गरज नाही. मनुष्य हीच जात आपण समजायची! मात्र उत्तम संस्काराने माणूस उच्च कोटीला पोचू शकतो. संस्कार माणसाला मोठे करतो. माणसाचा देव घडवतो. संस्कारी व्यक्तीत परमेश्वराचा—रामाचा वास असतोच. चोखामेळा! उत्तम संस्काराने त्याने विठ्ठलाला आपलासा केला. उत्तम संस्कारानेच संत रामाला पाहू शकतात.

उत्तम संस्काराने, कृतीने, माणसाच्या वागण्याने आपल्याला कळते की ह्या व्यक्तीला राम शोधायला कुठे देवळात जाण्याची गरज नाही, आणि देवळात जाऊन राम भेटतो म्हणून कुणी सांगितले? माझ्या पाहाण्यातल्या एक बाई रोज पंचवीस वर्षे देवळात प्रवचनाला जाताहेत पण घरी त्याचा काहीच उपयोग नाही. त्या आपल्या सुनेची गरज, अड-नड भागवण्यासाठी एकहि दिवस आपले प्रवचन चुकवायला तयार नाहीत. बिचारी नोकरी करणारी सून मरमर मरून नोकरी करते, घरी काम करते. आपली दोन्ही मुले दुसऱ्या बाईकडे सांभाळायला ठेवते आणि अशा म्हातार-

पणी ही प्रवचने ऐकणारी सासूबाई आपल्या आईकडे किंवा मुलीकडे दोन-दोन महिने राहते. त्याच्या उलट त्यांच्याच शेजारीणबाई ! आपल्या सुनेची गैरसोय होऊ नये म्हणून सुट्टीशिवाय ( नातवंडांच्या ) यात्रेला देखील जायला तयार नसतात. मग आता सांगा ' सोय जाणील तो सोयरा ! ' तसे राम ह्या बाईंना घरातच सुनेची सोय पाहाण्यातच भेटल्याचा आनंद होतो. ती म्हणते–' मला सुनेजवळच म्हातारपण काढायचंय, तिच्या हातून सेवा करून घ्यायची आहे, मग तिची गैरसोय करून मला देवळात प्रवचने ऐकायची नाहीत, यात्रा करायच्या नाहीत. असे करण्याने मला देव थोडाच भेटणार आहे ! त्यापेक्षा तिच्या सोयीने घेण्यातच मला तीर्थयात्रेचे पुण्य लाभेल. ' आता सांगा ह्या बाईंना खरा राम समजलाय ! असे म्हटले तर पटते.

घरच्याना दुःखी करून आयुष्यभर देवळात गेलात तरी तुम्हाला राम भेटणार नाही. पण दुसऱ्याच्या मनाचा कप्पा समजून वागलात तर देवळात न जाता देखील तुम्हाला घर बसल्या राम भेटेल. राम जगाच्या कल्याणासाठीच अवतार घेता झालाय. तो सर्वांचा आहे. सूर्य जसा एखाद्या करता उगवत नसतो. तो सर्वांसाठी सारखा प्रकाश देतो. तसाच राम सर्वांचे कल्याण करणारा आहे ! पण जाणून घेण्याची शक्ती वृत्ती आपल्यात हवी मला राम भेटला पाहिजे, मला राम पावला पाहिजे त्यासाठी रामाला काय आवडते ह्याचा विचार करायला हवा ! राम तुमच्या हृदयातच आहे. वरील प्रमाणे तुम्हाला, म्हणजे आपल्याला समजणे हीच रामाची भेट ! अशा प्रकारे राम पाहिला की राम भेटल्यासारखेच आहे. ही वृत्ती नेमकी संताजवळ असते. त्यामुळे ते संत होतात. त्याना परमेश्वर लवकर भेटतो. आपल्याला भेटत नाही. संत ज्या दृष्टीने रामाला पाहातात ती दृष्टी आपल्यात नसते. कारण आपण आयुष्यभर तुझे नी माझे ! करत बसतो. तसं संताप्रमाणे " अवघे विश्वची माझे घर ! " ह्या सूत्राचा अर्थ समजून वागायला हवे ! आपला कदाचित लोकांना उपयोग झाला नाही, तरी उपद्रव होता कामा नये ! ही कृति देखील मोठी आहे. रामाची भेट घडवणारी आहे.

जय–श्रीराम—जय साई—

★

# बाबांनी पहाटेस जागे केले आणि...

—सौ. देवकी वासुदेव सकपाळ
स्युएज प्युरिफिकेशन स्टाफ क्वार्टर्स,
तुलसी पाईप रोड, दादर, मुं. २८

● आज मी बरीच वर्षे माझ्या कुवतीप्रमाणे शिरडीची वारीसुद्धा करते. माझ्या कुटुंबातील माझ्या लहान मुलीपासून तो थेट पतीराजापर्यंत सर्वांची श्रीसाईबाबांवर अढळ श्रद्धा आहे. माझ्या संसारात रोजच्या रोज काहीना काही अडचणी असतातच. माझा असा एकही दिवस जात नाही. अंथरूणात पडल्या पडल्या चटकन झोप येईल असं मला कधीच झालं नाही. रोजच्या रोज मुलांवरून म्हणा, नाहीतर पतीराजांकडून काहीना काही तरी खटके उडतात. रोज रात्री झोपी जाण्यापूर्वी मी काहीना काही तरी काम करतेच करते. कधी भाजी साफ कर, कधी तांदूळ निवड, मुलांच्या डब्याची तयारी कर अशी काहीना काही तरी कामे असतातच. ही कामे झाल्यावर मी काही तरी वाचते. कधी साईलीला तर कधी एखादे अध्यात्मिक मासिक अंक काही तरी. झोपी जाण्यापूर्वी मी रोज प्रार्थना करी की बाबा मला काहीतरी लिहायला प्रवृत्त करा, प्रेरणा द्या. एका रात्री मी अशी आवर्जून प्रार्थना केली व झोपी गेले. पहाटे चार वाजताच मला बाबांनी जागं केलं “ अग शिरडीला चल चल ना ” अशी घोषणा करीत ते मला उठवत होते. मी एकदम जागी झाले. हे काय ! माझ्या कानात कोण येऊन बोलतय आणि मी चक्क लागलीच जागी झाले. आणि उठल्या उठल्याच मला जाग कशी आली ते मी मुलांना सांगत सुटले. मुले माझी वेडीची चेष्टाच करू लागली. मी नंतर पतीराजांना सांगितले, “ अहो, ऐकलत का ! आज की नाही बाबांनी मला शिरडीला बोलावलं आहे. ” त्यांनीही मी सांगितलेले सारे काही ऐकून घेतले, व पूजा अर्चा करायला सुरुवात केली. माझ्या मात्र मनात सारखं घोळत होतं की आज असं कसं घडलं ! आपण नेहमी शिरडीला जाणारे गुरुपौर्णिमा वगैरे काही एक केले नाही म्हणून की काय ? बाबांनी हा असा दृष्टांत दिला. माझं वेडीचं लक्षच कुठे घर कामात लागेना.

पण आमच्या बाबांची गंमत तर पहा ना ! माझे पतीराज कचेरीत जाण्यास निघणार तोच त्यांच्या कचेरीतले श्री. कोकणेसाहेब अचानक आले आणि सकपाळना काहीच हासभास नसताना म्हणाले, ‘ अहो सकपाळ, चला आपण शिरडीला जाऊ

या.' सकपाळ मुग्ध होऊन त्यांच्याकडे पहातच राहिले कारण सकाळी आपली सौ. मला बाबा बोलावताहेत म्हणते काय आणि कोकणेसाहेब मला शिरडीला चला म्हणून विचारताहेत काय याचा अचंबाच वाटला. आणि तासाभरात तयारी करून कोकणे व सकपाळ टॅक्सीने शिरडीला निघून गेलेसुद्धा. आहे की नाही आमच्या श्रीबाबांचा चमत्कार! असे चमत्कार नेहमी माझ्या आयुष्यात घडत असतात.

अहो साईनाथ बाबा! तुम्हाला माझे लाख लाख प्रणाम! एकंदर घडलेल्या घटनेने मी आनंदात हर्षून गेले. मी नाहीतर नाही पण माझे पतीराज तरी साईबाबांकडे भेटावयास गेले.

# श्रद्धेचे फळ

–कु. सीमा लक्ष्मण गोलतकर
ई ५।६ न्यु. कॉलनी, भटवाडी
घाटकोपर, मुंबई ८४

● बाबा आपल्या भक्तांवरील संकट कसे दूर करतात, व त्यांच्या मार्गातील अडथळे कसे दूर करतात, हे मला या अनुभवानेच कळले.

॥ साई तारी त्याला कोण मारी ॥

लहानपणापासूनच बाबांवर माझी अत्यंत श्रद्धा आहे. १९७९ साली मी एस. एस. सी ला प्रथमच शाळेतून बसली होती. पण तेव्हा मला वारंवार अशक्तपणा येत असे. त्यामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असे, व ऐन परिक्षेच्या वेळी आजारपणामुळे मला परिक्षेस बसता आले नाही. मी व आमच्या घरातल्यानी ठरविले की आता ऑक्टोबरला न बसता एकदम मार्च १९८० ला परिक्षेला बसायचं, तरी माझा अशक्तपणा कमी झाला नव्हता. पुस्तक वाचायला घेतले की लगेच झोप अनावर होई. त्यातच छोट्या–मोठ्या तक्रारी चालू होत्या. परिक्षा जवळ येऊन ठेपली. अभ्यास तर म्हणण्यासारखा झाला नव्हता. एक वर्ष फुकट गेले होते. माझी साईबाबांवर अत्यंत भक्ती आहे. मी बाबांना स्मरून परिक्षेला गेली. पेपर साधारण बरे गेले.

आणि आता खरी माझी सत्वपरिक्षा सुरू झाली. कित्येकांना वाटत होते की मी नापास होणार, तसे अनेकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बोलूनही दाखविले, मन अगदी त्रासले होते.

मी मात्र पदोपदी बाबांना सांगत होते. त्यांचाच धावा करीत होते. मी बाबांना म्हटले की, 'बाबा मला पास करा. रिझल्टवर 'पास' असेच येऊ दे! बाबा मला पुढे शिकायचे आहे.

माझी मोठी बहीण एके दिवशी मला म्हणाली की, 'तू ह्यावेळेस पास नाही झाली तर येत्या ऑक्टोबरला बस. पण मला, एस. एस. सी परीक्षेच्या वाऱ्या करायच्या नव्हत्या व बाबा मला पास करणार असे मनोमन वाटत होते. अखेर कर्ते करविते बाबाच आहेत.

रिझल्टचा दिवस उजाडला. सकाळीच वडील लवकर उठून पूजा-अर्चा करून निकाल आणायला गेले, नि माझ्या छातीत धडधडू लागले. मी बाबांना मनातल्या मनात म्हणाली की 'बाबा मला पास केले तर हा अनुभव मी तुमच्या 'साईलीला' मासिकात छापायला देईन, व दादरच्या 'साईनिकेतन'मध्ये बाबांपुढे पेढे ठेवीन.
नंतर थोड्याच वेळानी वडील निकाल घेऊन आले, व बरोबर एक पेढ्याचा बॉक्स. मला बाबांनी परीक्षेत चांगल्या मार्कांने पास केले हे काय सांगायला पाहिजे! आणि मुख्य करून मला समाजशास्त्राचा पेपर कठीण गेला होता त्यातच अपेक्षेपेक्षा जास्तच मार्क मिळाले. हे सर्व मला 'श्रद्धेचे फळ' मिळाले व आता माझा अशक्तपणा बाबांच्या कृपेने पुष्कळसा कमी झाला आहे.

पुढे आम्ही सहकुटुंब 'साई निकेतन' मध्ये गेलो व बोलल्याप्रमाणे बाबांना पेढे दिले व आता हा लेख 'साईलीले'त देत आहे. माझा पुढील वर्षाचा अभ्यास चालू आहे. सर्व बाबांची कृपा आहे.

बाबांची कृपा अशीच माझ्यावर व आमच्या सर्व कुटुंबावर सतत राहावी हीच सदिच्छा.

॥ साईबाबांना माझे शतशः प्रणाम् ॥

☆ ☆

# इच्छेसी देता आशिर्वाद....

—सौ. सरोज भालचंद्र निबंधे
झेंडा चाळ; घर नंबर ७।२००
मु. पो. ऊगार खुर्द जि. बेळगाव ता. अथणी

● मी जवळजवळ वयाच्या ८ व्या वर्षापासून श्रीसाईबाबांची भक्ती करते. त्यावेळी मी फक्त बाबांचे नावच ऐकून होते. प्रत्यक्षात त्यांची समाधी कुठं आहे ! याची कल्पना मला नव्हती. तोंडानं मात्र त्यांचंच नामस्मरण अखंड सुरू असायचं. आजपर्यंत त्यांचे अनुभव भरपूर आहेत त्यातीलच हा एक अनुभव,

माझे लग्न झाल्यानंतर मला पहिल्या मुलाच्या वेळी खूप त्रास झाला. मुलाचे वजन १२ पौंडपेक्षा जास्त असल्याने बाळंतपणात त्रास होवू नये म्हणून मेजर ऑपरेशन करावे लागले पण त्यात मुलगा मात्र दगावला.

दुसऱ्या वेळेस मुलगी झाली आणि शिर्डीला श्रीबाबांच्या दर्शनाला जाण्याचा योग आला. तिला घेवूनच मी शिर्डीला गेले. तिला बाबांच्या पायावर घातले आणि त्याचवेळी मनात विचार आला, मुलगा झाला असता तर आणखी एकदा बाबांच्या दर्शनाला आले असते आता पुनः कशासाठी येणार मी ! कारण शिर्डी आमच्या गावापासुन खूपच दूर आणि घरची परिस्थिती अगदीच गरीब जणू बाबांना माझे विचार कळले. माझ्या गावी मी परत आले आणि लगेचच बाबा माझ्या स्वप्नात आले. 'तुझ्या मनात शिर्डीला माझ्या दर्शनाला पुनः न येण्याबद्दल [ कारण मुलगा झाला. तरच येवू ' असा विचार त्यावेळी मनात येवून गेला होता ] इच्छा झाली. म्हणून यावेळीही तुला मुलगीच होणार, खूप त्रास होणार. जीवावरचं संकट ओढवणार पण मी तुझ्या पाठीशी आहे. कसलाही त्रास तुला होवू देणार नाही. पण जीवन-मरणाच्या उंबरठ्यावर तुला उभं राहून सर्व सहन करावे लागणार असे म्हणून स्वप्नात जागच्याजागी ते अंतर्धान पावले. खरोखरीच मला दुसरीही मुलगीच झाली. आणि अक्षरशः मरणाच्या दाढेतून बाबांनी माझी सुटका केली. नुसता मनात विचार आला आणि बाबांनी मला शिक्षा दिली. पण सुटकाही त्यांनीच केल्यामुळे माझी त्यांच्याबद्दलची श्रद्धा-भक्ती आणखीनच वाढली.

तिसऱ्या वेळी त्यांनी परत स्वप्नदृष्टांत दिला. स्वप्नात त्यांनी माझ्या ओटीत नारळ–प्रसाद दिला. 'यानंतर तुला हुषार बुद्धीमत्तेचा गुणी मुलगा होईल. काळजी करू नकोस. जरा उशीराने होईल' असं म्हणून ते नाहीसे झाले. (अंतर्धान पावले.) पुढे जवळजवळ ५ वर्षे मला मूल झाले नाही. त्यानंतर मुलगा झाला. आज तो कॉलेजला जातो. या गोष्टीला जवळजवळ १८–१९ वर्षे झाली. पण हा प्रसंग अगदी आज घडल्यासारखा वाटतो. त्यांच्या कृपेने तो एस. एस. सी. ला कर्नाटकात ८ व्या क्रमांकाने पास झाला. त्यालाही बाबांची सतत आठवण असते. बाबांचा प्रसाद म्हणून त्याचे नाव 'गुरुदास' असे ठेवले. त्यांच्याच कृपेने तो वाढतो आहे.

कोणत्याही प्रसंगी माझ्यापाठी बाबा उभे असतात. माझ्यासारख्या गरीबीचे जीवन जगणाऱ्याला बाबांचा आधार मोठा आहे. माझ्या दोन्ही मुलींची लग्ने त्यांच्याच कृपेने झाली असं मी मानते. आज त्या दोघीही आपापल्या घरी सुखात नांदत आहेत. माझ्या संसारात कसलीच उणीव–कमतरता बाबांनी भासू दिली नाही. त्यांची अशीच अखंड कृपा माझ्या सर्व कुटुंबियावर राहो, त्यांचे विस्मरण मला कधीही न होवो, हेच त्यांच्या चरणी मागणे.

★

# श्रीसाई कृपा

—श्री. ग. दे कुळकर्णी
'कुलदीप' तांबरी
उस्मानाबाद, ४१३५०१

● दि. २८ जुलै ७८ हा दिवस. नांदेडला मी संघटनेच्या कामासाठी गेलो होतो. ते काम दुपारी संपले. सकाळपासूनच मराठवाडा विद्यापीठ नामांतर विरोधी आंदोलनाला सुरुवात झाली होती. दुपारी ते तापले. सायंकाळी पेटले. एस. टी. बंद. रेल्वे बंद. हे बंद ते बंद. सारे बंदच बंद. संघटनेच्या कामात मिळालेल्या यशाचा आनंद बंदमध्ये बंद झाला. आंदोलन बेमुदत होते. नांदेडला बेमुदत थांबणे मला शक्य नव्हते. कारण रजा, पैसा, ओळखीचा अभाव, सुरक्षितता इ. इ. सारेच मज-जवळ मोजकेच होते.

उस्मानाबादला परतण्यासाठी मालवाहू मोटारीतून प्रवास करण्याचे मी ठरविले. रात्री १० ची वेळ मला सुरक्षित वाटली. मी स्टँडवर गेलो. ४–५ ठिकाणी चौकशी केल्यावर एका दुकानातून एक ट्रक लातूरला जाणार असल्याचे कळले. लातूरहून उस्मानाबादला जाणे सोपे असे मला वाटले, आणि समजा ते जमले नाही तर तेथे १–२ मित्र असल्यामुळे मी लातूरला जायचे ठरविले. दुकानदाराने मला एका खुर्चीत बसायला सांगितले. ट्रक यायचा, त्यात माल भरला जायचा आणि तो जायचा. मधून मधून मी लातूरला जाणाऱ्या ट्रकची चौकशी करीत होतो. प्रत्येक नवीन येणारा ट्रक लातूरला जाणार असे मला वाटत होते. पण लातूरला जाणारा ट्रक अखेर रात्री एक वाजता आला. त्यात पोती चढवली गेली. मला त्या पोत्यांवर बसण्यास सांगितले. मी बसलो. ट्रक सुरू झाला. मला झोप लागली.

पुढे ट्रक थांबल्यामुळे मी जागा झालो. सकाळ झाली होती. ट्रक लातुरच्या स्टँडवर उभा होता. मी उतरलो. ' श्री साईकृपा ' ट्रकवर लिहिलेले मी वाचले. भाड्याचे पैसे दिले. प्रातर्विधी आटोपले. नांदेडसारखच लातूरही बंद होते. एका मित्राच्या घरी जायला निघालो. पण एवढ्यात एक खाजगी मोटार माझ्या मागून येवून पुढे थांबली. त्यात बंदमधे अडकलेले माझे उस्मानाबादचे एक मित्र होते. ती मोटार उस्मानाबादला जाणार होती. जागेच्या अभावामुळे मोटारीतील साऱ्यांना नकार असतानाही त्या मित्रानी मला मोटारीत कोंबून घेतले.

उस्मानाबादला आल्यावर ते मित्र म्हणाले ' श्रीसाईकृपा ' सौ. आणि मुले घरी चिंतातूर होवून माझी वाट पहात बसलेली होती. मला पाहताच साऱ्यांना आनंद झाला. रात्री रोजच्याप्रमाणे श्री बाबांची आरती झाल्यावर सौ. ने नेहमीपेक्षा जास्त आणि वाक्यात घरपोच प्रसाद वाटला. त्याचे कारण विचारताच मी आज सुखरूप परत आल्याबद्दल. सौ. ने बाबांना काल सांगितल्याचे मुलाकडून कळले. बंदमध्ये नांदेड ते उस्मानाबाद हा प्रवास म्हणजे श्री साईकृपाच !

# साईबाबा द मास्टर

लेखक : श्री. ई. भारद्वाज, एम. ए.

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१।३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स
रेनॉल्डस रोड, वडाळा (पूर्व) मुं. ४०००३७

साईबाबांवर अनेक पुस्तके सध्या उपलब्ध आहेत. त्यातील वरील इंग्रजीतील पुस्तक उल्लेखनीय आहे.

या पुस्तकाची सुरुवात अतिशय आकर्षक झाली आहे. लेखकाचा पुतण्या १९५५ साली वारल्यानंतर त्याच्या मनावर निराशेचे सावट आले. त्याच्या मनात विचार आले की, ' मी कोण आहे ? या जीवनाचा अर्थ काय ? ' अशा मनःस्थितीत त्याच्या एका समवयस्क नातेवाईकाच्या आग्रहाखातर तो शिर्डी येथे श्रींच्या दर्शनाला जातो. पण समाधिमंदिरात त्याच्या मनात पहिला विचार हा येतो की, ५० वर्षापूर्वी पुरलेल्या या संताच्या शरीराला किती घाण येत असेल ! म्हणून काही भक्तमंडळी या ठिकाणी सतत धूप व अगरबत्ती लावतात ? त्याच्या मनात आलेला हा विचार त्याने अतिशय प्रांजळपणे मांडला आहे, आणि याच प्रांजळपणामुळे त्याचे स्वतःचे अनुभव व चिंतन या पुस्तकात उल्लेखनीय ठरले आहे. तीच या पुस्तकाची जमेची बाजू आहे. नंतर दुसऱ्या दिवशीच श्रीबाबा त्याला समाधीमंदिरात :स्वानंदसुखाच्या समाधीत नेतात. लेखकाची अंतर्ज्योत जागृत होते. तिला बाबा श्रद्धेचे तेल अनेक अनुभव देऊन ती सतत तेवत ठेवतात. हाच लेखक श्रींचे मंदिर विद्यानगर, आंध्र-देश येथे बांधतो व तेथे श्रींच्या भक्तीचा प्रचार करतो.

यानंतर लेखकाने श्रींच्या चरित्राचा आढावा घेतला आहे. पण तो आढावा त्याच्या जीवनातील एक एक पैलू स्पष्टपणे दर्शवणारे सर्व प्रसंग एकाच मथळ्याखाली गुंफून घेतला आहे. उदाहरणार्थ श्रीबाबांचे सर्वगामित्व, श्रीबाबांचे सर्व संतांशी आत्मैक्य वगैरे या सोयिस्कर मांडणीत त्याने अनेक भक्तांच्या जीवनातील प्रसंग दिले आहेत. काही स्वप्नांचा आध्यात्मिक अर्थ लावलेला आहे. त्यातील स्वप्न व त्यांचे अर्थ वाचनीय आहेत परंतु कै. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या शिर्डी,

डायरी' या पुस्तकातील बराचसा भाग वगळता येण्यासारखा असूनही तो छापला आहे. त्यामुळे इथे वाचतांना कंटाळा येतो.

महासमाधीनंतरही बाबांचे मार्गदर्शन कसे अनेक भक्तांना लाभले आहे. हे दर्शवणारे अनेक प्रसंग फार बोलके आहेत.

झाडाची परीक्षा त्याच्या फलावरून करायची असते तसेच एखाद्या संताने किती संत व सद्भक्त निर्माण केले यावरुन त्याची योग्यता ठरत असते. असे म्हणून लेखकाने श्री उपासनी महाराज, स्वामी शरणानंद, स्वामी केशवय्या व इतर भक्तांची थोडक्यात माहिती दिली आहे. त्यामुळे श्रींचे अमर्यादित्व सिद्ध होते. विशेष म्हणजे श्रींनाच गुरू मानून अनेकांनी साधना केली व ते सिद्धावस्थेत गेले. त्यामुळे लेखकाने अनेक साईभक्तांच्या मनातील एक शंका की जिवंत असलेला सत्पुरुषच साधनेला पूर्णत्वास नेतो ही दूर केली आहे. स्वतः लेखक श्रींनाच आपले गुरू मानतो व श्रींनीही आपण त्याचे गुरू आहोत हे निरनिराळ्या प्रसंगानी पटवून दिले आहे.

लेखकाची लेखनशैली संथ आहे. ज्यावेळी तो अंतर्मुख होऊन लिहितो त्यावेळीच त्याच्या शैलीत प्रतिभेचा विलास आढळतो. उदाहरणार्थ द्वारकामाईत पाणी घालून पेटवलेल्या पणत्यांचा त्याने फार सुंदर अर्थ लावला आहे. तो म्हणतो की, या पणत्या नसून अनेक जणांची अंधकारमय अंतःकरणे होत श्रींनी आपल्या कृपेने पाणी त्यात घालून त्यांना उजळवले व जणू सूचित केले की, त्यांचे पूर्ण आयुष्य या कार्यासाठी आहे. त्याने या पुस्तकाची किंमत अतिशय वाजवी ठेवली आहे. कारण १५ रुपयात ३९३ पानांचे पुस्तक मिळणे दुरापास्त आहे.

पुस्तकाची छपाई घाईने झाल्यामुळे अनेक ठिकाणी स्पेलिंगच्या चुका राहिल्या आहेत. शिवाय श्रींच्या जीवनातील अनेक प्रसंगांवर चित्रे टाकता आली असती त्यामुळे पुस्तकाच्या आकर्षकपणात भर पडली असती. पुस्तकातले हे दोष अर्थात तितकेसे जाणवत नाहीत.

# श्री साईबाबांची द्वारकामाई

—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

● संत चुडामणि भगवान श्रीसाईबाबांच्या समाधी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराशी चबुतऱ्यावर अधिष्ठीत असलेल्या पांढऱ्याशुभ्र स्फटिकरूप नंदीला वळसा घालुन बाहेर पडल्यावर सभांगण लागते. या सभांगणातील उजव्या हाताच्या बाजूच्या मार्गाने म्हणजे पुरुष भक्त मंडळी आरतीसाठी जिथे उभी रहातात त्या बाजूने सुरक्षा विभागाच्या खोली जवळून बाहेर पडले की रस्ता लागतो. या रस्त्यावर आल्यावर डाव्या हातास वळले की अवघ्या पंधरा–वीस पावलावर एक लांबच लांब व आतून काहीशा उंचीवर पत्रा आच्छादलेली एक इमारत लागते. या इमारतीला 'द्वारकामाई' 'मशिदमाई' किंवा 'द्वारावती' असे म्हणतात. श्रीसाईनाथांचे हयातीतील सारे अवतार नाट्य, साऱ्या योगलीला, सारे सारे चमत्कार याच इमारतीत घडलेले आहेत. श्रीबाबांच्या सहवासात आलेल्या अनेक थोर व नामांकीत व्यक्तींचे पाय याच ठिकाणी लागलेले आहेत. श्रीसाई व त्यांची निकट भक्तमंडळी यांचा सुखसंवाद याच वस्तूने ऐकलेला आहे. असंख्य व्याधिग्रस्तांच्या पीडा आणि विकार याच इमारतीत आल्याने कायम दूर झाले आहेत. अनेकांना जीवनाचे मार्गदर्शन येथूनच झाले आहे. निकटभक्त कै. नानासाहेब चांदोरकर यांना गीतेचे पाठ बाबांनी येथेच दिले तर पैगंबर वासी अब्दुल बाबाला कुराणाचे धडेही त्यांनी येथेच दिले. मिती आश्विन शुद्ध १० मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर १९१८ शके १८४० रोजी विजया दशमीस दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी आपल्या देहाचा त्याग याच इमारतीत केला. देहत्यागापूर्वी काही वेळ अगोदर भक्त लक्ष्मीबाई शिंदे यांना नवविधाभक्ती सूचक नऊ रुपये दक्षिणा भेट दिली ती याच इमारतीत. बाबा याच इमारतीत बसत असत व त्यांच्या समोर धुनी अहोरात्र  टत ठेवलेली असे. येथेच बाबांची आरती होत असे व दुपारच्या आरतीनंतर वेद्याचा काला करून तो ते सर्वांना वाटत असत. श्रीबाबांच्या जीवनातील असंख्य टना याच इमारतीने पाहिलेल्या असल्याने या द्वारकामाईला एक आगळेच महत्व प्राप्त झालेले आहे.

चांदभाईच्या सोयरीकीच्या लग्न वरातीबरोबर बाबांचे शिरडीत पुनरागमन झाल्यावर खंडोबा मंदिरातील पुजारी म्हाळसापती भगत यांनी त्यांची अत्यादराने विचारपूस केली व बाबांची सोय अगदी प्रथम याच इमारतीत करण्यात आली. काशिराम शिंपी व आप्पा जागले या दोघांनी बाबांची सर्वात जास्त सेवा केली ती याच इमारतीत. बाबा प्रथम आले तेव्हा ही इमारत 'शिरडीतील पडकी मशिद' याच नावाने ओळखली जात असे. मशिद–म–शि–द महान शिवपद देणारी जागा, शिव साईपदांच्या अवर्णनीय स्वरूपाचे दर्शन देणारी जागा म्हणून मशिद हे नाव.

हीच आपुली द्वारकामाता । मशीदीचे या अंकी बैसता ।
लेकुरां ती देई निर्भयता । चिंतेची वार्ता नुरेची ॥
एकदा हिचे अंकी जो बैसला । बेडा तयाचा पार पडला ।
सावलीत हिचे जो पहुडला । तो आरूढला सुखासनी ॥

श्रीसाईसच्चरित अध्याय ७ ओव्या ४७–४९ मधे बाबांनी या द्वारकामाईचे असे वर्णन केले आहे. भक्त बाळासाहेब मिरीकरांना त्यांनी हे सांगितले. त्यांनी म्हटल्याप्रमाणे मशीद ही द्वारका किंवा द्वारकामाई होय यात शंका नाही. श्रीसाईबाबा मशिदीला 'द्वारकामाई' का म्हणत असत याचा उलगडा तेव्हा काय आणि आता काय फारसा कुणाला झाला नाही. बाबांचे बाळ म्हणजे कै. बाळकृष्ण विनायक देव, ठाणे यांनी पुष्कळ परिश्रम घेऊन यासंबंधी संशोधन करून एक 'श्रीद्वारकामाई संशोधनांक' (वर्ष १४, अंक १, २, ३) प्रसिद्ध केला आहे. त्यात त्यांनी थोडक्यात असे सांगितले आहे की, भगवान श्रीकृष्ण निजधामास जाण्यापूर्वी त्यांनी आपली (द्वापार युगातील) सोन्याची द्वारका समुद्रात बुडवून टाकली. हल्ली अस्तित्वात असलेली (कलीयुगातील) द्वारका ही दुसरी निराळीच आहे. काही कारणामुळे रुष्ट झालेल्या श्री रुक्मिणी मातुश्रींना भेट देऊन त्यांची समजूत करण्याकरिता आणि भक्तश्रेष्ठ श्रीपुंडलिक यांना दर्शन देऊन वर देण्याकरिता श्रीकृष्ण परमात्मा फार फार वर्षांपूर्वी एका काळी दिंडीरवनात पुन्हा आले. द्वारकेची सर्व संपत्ती, सर्व वैभव, सर्व ऐश्वर्य इकडे आणून भक्तवर पुंडलिक यांचे वरमागणीस मान देऊन दक्षिणेत दिंडीरवनात दक्षिण द्वारकेची त्यांनी स्थापना केली. भक्त पुंडलिक यांनी बसण्याकरिता पुढे केलेल्या वीटेवर पंढरपूर येथे अठ्ठावीस युगे श्री रुक्मिणी मातुश्रींच्या सान्निध्यात ते तिथे उभे आहेत. हे सांगताना दिंडीरवनाचा त्यांनी एक नकाशा जोडला आहे. त्यात दिंडीरवन दाखवून पंढरपूर हे दक्षिण द्वारका होय, व तिचे कोल्हापूर पश्चिमद्वार, शूर्पाल दक्षिणद्वार, त्रिविक्रम क्षेत्र पूर्वद्वार व सिद्धेश्वर–कोपरगाव शिर्डी भाग उत्तरद्वार अशी चार द्वारे दाखविली आहेत.

तेव्हा शिर्डी हे दक्षिण द्वारकेचे एक उत्तर द्वार असावे असे अनुमान श्रीदेव काढतात. म्हणुन मशिदमाईला बाबा द्वारकामाई म्हणत.

मशिदीला श्रीबाबा द्वारकामाई का म्हणत असत याविषयी आणखीन एक छोटासा पण सुयोग्य आधार मिळतो. तो असा—श्री. के. नारायण अय्यर या प्रसिद्ध लेखकाने 'भारताचा सनातन इतिहास' असा एक आंग्ल ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथाच्या खंड दुसरा भाग १ पान ८९-९० यावर द्वारकेची एक निश्चित व्याख्या स्कंदपुराणातून उद्धृत केली आहे ती अशी—

"चतुर्णामपि वर्णाणां
यत्र द्वारानि सर्वतः।
अतो द्वाराव त्युक्ता
विद्वद्भिस्तत्ववेदिभिः॥

याचा अर्थ असा धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारी पुरुषार्थासाठी चारही वर्णांना (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र) जेथे सर्वत्र द्वारे खुली असतात, मुक्त द्वार असते अशा स्थानाला तत्ववेत्ते विद्वान द्वारावती किंवा द्वारका असे म्हणतात. श्रीबाबांच्या या मशिदीत किंवा दरबारात या चारही पुरुषार्थांचा लाभ चारही वर्णांच्या लोकांनाच नव्हे तर वर्णातीत लोकांना म्हणजे यवन वगैरे सर्वांना इतकेच नव्हे दुर्धर व्याधींनी पिडलेल्या रोग्यांनाही होत असे तेव्हा असे हे बाबांचे निवासस्थान म्हणजे साक्षात् द्वारकामाईच होय यात बिलकूल शंका नाही.

श्री बाबा या मशिदीला चुकूनही मशीद कधीच म्हणत नसत. तिचा उल्लेख ते नेहमी द्वारका, द्वारकावती, द्वारकामाई असाच करीत; व क्वचित प्रसंगी ते मशीद-माई म्हणत.

एकदा बाबांचा अत्यंत लाडका भक्त शामा उर्फ माधवराव देशपांडे यांचा रामायणातील वानर सैन्यावरून सुखसंवाद चालला होता. बोलता बोलता शामाने विचारले' 'देवा हे खरे आहे काय रे ! त्यावर बाबा चटकन म्हणाले, 'शाम्या ! मी द्वारकामाईत बसून खोटं बोलतोय काय रे !

इ. स. १९०९ ते १९१३ च्या सुमारास पुण्याच्या प्रसिद्ध लेखिका श्रीमती काशीबाई कानिटकर (श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे इचलकरंजीकर राणीसाहेब यांच्या मातोश्री) या बाबांच्या दर्शनास गेल्या होत्या. बाबांचे यापूर्वीचे अनेक चमत्कार ऐकून त्यांना त्यावेळी असे वाटले होते की, हा मुसलमान फकीर

कृष्ण मार्गानुवर्ती तर नसेल ना ! ' त्यांना पहाताच बाबांनी त्यांच्या मनातला विचार तात्काळ जाणला व ते छातीला हात लावून म्हणाले, ' माई ! हा शुद्ध ब्राह्मण असून पूर्णतया शुभ्र मार्गगामी आहे, ही ब्राह्मणाची मशिदमाई आहे. या द्वारकेत राहून काळया मार्गाचा अवलंब करणे कुणालाही शक्य होणार नाही.

श्रीसाईबाबांना घेऊन म्हाळसापती भगत सुरूवातीस येथेच आले खरे पण तेव्हा या मशिदीत सर्वत्र खाच खळगे पडलेले व ढोपर ढोपर कचरा पडलेला होता. या मोडक्या तोडक्या इमारतीत बसून रात्रंदिवस चिलीम फुंकणाऱ्या, गावात तीन चार विशिष्ट घरीच शिळ्या भाकरीचे तुकडे मागून खाणाऱ्या, अंगावर फाटके तुटके कपडे घालणाऱ्या फकीरास निर्गुण परमात्म्याचे सगुणावतार प्रतीक आहे असे कोण समजणार ? परमभक्त श्रीनानासाहेब चांदोरकर यांच्या मनात आपल्या बाबांची ही मशीद चांगली व्यवस्थीत करून तिची दुरुस्ती डागडुजी करून ती रहाण्यालायक करावी हा विचार प्रथम आला. पण बाबा त्यांच्या विचारांना थाराच देईनात. पण एकदा एक घटना घडली. एके दिवशी म्हाळसापती भगत दररोजच्या नियमानुसार गावात भिक्षेस निघाले ते त्या मशिदीवरून जात असता, नानासाहेब चांदोरकर मशिदीच्या बाहेर उभे होते. त्यांच्याजवळ नानासाहेब ही मशीद दुरुस्तीची गोष्ट पुन्हा काढणार तोच साईबाबांनी म्हाळसापतीला हाक मारली त्यासरशी ते मशिदीत गेले. म्हाळसापतींनी बाबांना ओढण्याकरिता चिलीम भरली व ती त्यांचे हाती दिली. तो बाबा म्हणाले, ' कारे भगत ( म्हाळसापती ) तो बाहेर कोण उभा आहे ? ' तेव्हा ते म्हणाले, ' नानासाहेब चांदोरकर आहेत. '

' होय का ? अरे भगत, मग तुला विचारावयाचे आहे. हा बाहेर उभा तो नाना आहेना, तो म्हणतो की बाबा मी नवीन मशीद बांधून देतो. मग काय नवीन मशीद बांधून घ्यावयाची आहे, का आपली जुनी बरी आहे ? कशाला नवीन पाहिजे बरे ? '

त्यावर म्हाळसापती म्हणाले, ' बांधीना का नवीन. आपल्या दोघांना बरी होईल; उठा बसावयास, वेळ पडल्यास झोपावयास. '

अशा तऱ्हेचा संवाद ही मशीद दुरुस्तीचे पूर्वी झाल्यावर म्हाळसापतीने नानांना रहाक माली व लागलीच एक नारळ आणून फोडला व कामास सुरुवात केली. नानांनी मशिदीच्या जीर्णोद्धाराचे काम निमोण, जि. अहमदनगरचे भक्त श्री. नानासाहेब निमोणकर यांचेकडे सोपविले. प्रथम बाबा संमतीच देत नव्हते ती म्हाळसापतीने मिळविली. मग

जुनी इमारत पाडून नवीन बांधकाम सुरू झाले पण बाबा त्यात वारंवार अडचणी निर्माण करीत. कधी दगड–विटा–चुना फेकून देत तर कधी झालेले बांधकामच पाडून टाकीत. याचे कारण त्यांना टोलेजंग व संपूर्ण नवीन अशी इमारतच नको होती. जुनी इमारत होती तशीच इमारत सुधारून हवी होती. शेवटी बाबांच्या इच्छेनुसारच बांधकाम पूर्ण करून आजची द्वारकामाईची इमारत जशी आहे ती दिसत आहे. द्वारकामाईचे काम पूर्ण झाले त्यावेळी बाबा जवळच निमगाव या गावी गेले होते. तेथून वाजत गाजत बाबांना शिरडीस आणण्यात आले व सुमुहूर्तावर त्यांची एखाद्या देवतेप्रमाणे या नव्या वास्तूत प्रतिष्ठापना करण्यात आली. द्वारकामाई इमारतीचे बांधकामास श्री. कोंडाजी सुतार, गबाजी व तुकाराम सुतार या तीन भावांनी खूपच परिश्रम घेतले. पुढे १९५१ साली संस्थान कमिटीने या द्वारकामाई इमारतीची परत सुधारणा करून तिला मजबुती आणली आहे.

द्वारकामाई इमारतीचे दोन भाग पडतात. एक उंच चार पायऱ्यांच्या चौथऱ्यावरील भाग व दुसरा चौथऱ्याखालील भाग.

द्वारकामाई मंडपाचे प्रवेशद्वार दक्षिणाभिमुखी आहे. पण मुख्य द्वारकावती मात्र पूर्वाभिमुखच आहे. द्वारकामाईच्या प्रवेशद्वारातून आत शिरताच समोरच उजव्या हाताच्या भिंतीच्या मध्यावर अंदाजे दहाफूट उंचीची चौखांबी टपरी आहे. यामध्ये जी एक जंगी खडबडीत शिळा दिसते, ती वर बाबा नित्य बसत असत. तीवर मध्यभागी आता संगमरवरी पादुका बसविण्यात आल्या आहेत. भक्तमंडळी या पादुकांवर भक्तीभावाने हळद-कुंकू वहातात. ही शिळा पूर्वी मशिदीला लागूनच होती. एके दिवशी एक चांगला तगडा पहिलवान शिरडीत आला तेव्हा बाबांनी त्याला ही शिळा हल्ली ज्या ठिकाणी ठेवलेली आहे तिथे नेण्यास सांगितले होते. तो पहिलवान त्या शिळेकडे व बाबांकडे टकमका पहातच राहिला. त्याचा पहिलवानीचा गर्व जिरला व तो थिजून जाऊन स्तब्ध उभा राहिला इतक्यात स्वतः बाबांनी हसत हसत केवळ आपल्या सटक्याने तो जंगी पाषाण हालविला व अवघ्या तीन खेपात तो सध्या जिथे आहे तिथे आणून ठेवला आहे.

या पाषाणापासून वीतभर उंचीवर पूर्व भिंतीवर श्रीबाबांची उजवा पाय खाली सोडलेल्या व डाव्या पायाच्या मांडीवर ठेवलेल्या स्थितीतील ६'×४' फूट आकाराची भव्य तसवीर आहे. या देवळीत विद्युतनलिका आहे. या देवळीच्या छपरावर श्री महालक्ष्मीची भव्य तसबीर बसविण्यात आलेली आहे. या देवळीच्या जवळच तीन फूट उंचीच्या चबुतऱ्यावर एक उघड्या तोंडाचा वाघाचा पुतळा बसविलेला आहे

एक दरवेशी बाबांच्या दर्शनाला आला त्याच्याबरोबर त्याचा चवताळलेला दोरखंड बांधलेला वाघ होता. बाबांची व त्याची दृष्टादृष्ट होताच त्या वाघाला त्याच जागी कायमची मुक्ती मिळाली. या घटनेचेच प्रतिक म्हणून हा पुतळा श्री. त्रिंबकराव श्रीपतराव शिलेदार या भक्ताने दिनांक १२।११।६९ ला संस्थानला अर्पण केला आहे. या मृत वाघाचे शरीर भक्त निवास या निवास स्थानासमोर असलेल्या महादेव मंदिरासमोर पुरण्यात आले असल्याने ती जागा या मृत वाघाची समाधी म्हणून ओळखली जाते.

श्रीसाईबाबा बसत असलेली शिळा किंवा पाषाण ज्या व्यवस्थित कोनाड्यात ठेवलेली आहे त्या भिंतीवर उजवी-डावीकडे काळे पट्टे विशिष्ट पद्धतीने ओढलेले दिसतात. हे पट्टे म्हणजे भिंतींची शोभा वाढविण्यासाठी म्हणून नव्हेत तर त्या काळया पट्टयांच्या वरच्या टोकाजवळ एक एक लहान कोनाडा तयार केलेला आहे. उजव्या हाताला सात व डाव्या हाताला दहा असे हे लहान लहान कोनाडे आहेत. त्यात पणत्या ठेवलेल्या आहेत या सर्व पणत्या सायंकाळी पेटविण्यात येतात. बाबांना मशिदीत द्वारकामाईत सर्वत्र दिवे पेटविण्याची भारी हौस होती. या पणत्यातून ओघळणाऱ्या तेलाचे डाग अन्य कोणत्याही रंगाच्या भिंतीवर उठून दिसू नयेत म्हणून या काळया रंगाचे पट्टे भिंतीवर ओढलेले आहेत.

श्री बाबांच्या बैठक पाषाणाजवळच उत्तर भिंतीच्या कोपऱ्यात एक बंद दार दिसून येते. हे दार उघडले तर ती एक लांबच लांब खोली आहे असे दिसून येईल. या खोलीत धूनीमाईसाठी लागणारे सर्पण, लाकडे, तेल, गोवऱ्या चाळलेली उदी इ. साहित्य ठेवण्यात आले आहे. या दाराजवळच कोपऱ्यात तेलाचे एक-दोन डबे व काही पणत्या पण ठेवलेल्या दिसतात.

या सर्पण खोलीच्या किंचित पुढे हिरव्या व आकाशी रंगाच्या संगमरवरी फरशांनी मढविलेले तुळशी वृंदावन आहे. पण यात तुळस मात्र लावलेली नाही. द्वारकामाईत येणारी भक्त मंडळी प्रसाद म्हणून यातील तुळशीची पानेच खुडून भक्षण करतात म्हणून येथील तुळस काढून ही कुंडी द्वारकामाईतील उत्तर भिंतीच्या लगतच्याच लहानशा बागेत ठेवण्यात आली आहे.

द्वारकामाईची उत्तरेकडील भिंत अर्धीच आहे. भक्त तिचा उपयोग बसण्यासाठीही करतात. या भिंतीच्या दुसऱ्या टोकास पूर्वाभिमुख अशी एक खोली आहे. त्या खोलीत श्रीबाबांची पालखी ठेवण्यात येते. प्रत्येक गुरुवारी तसेच उत्सव प्रसंगी ही लाकडी पालखी बाहेर काढून ती द्वारकामाईत फुलांनी उत्कृष्ट सजविली जाते फक्त दर गुरुवारीच या पालखीचा उपयोग द्वारकामाई ते चावडी व पुन्हा चावडी

ते समाधीमंदिर एवढ्याच मार्गाकरिता केला जातो तर उत्सवप्रसंगी द्वारकामाई ते चावडी व पुढे चावडी ते गावातील विशिष्ट मार्गाने मग समाधीमंदिर या मार्गानेच ही पालखी फिरविली जाते. ही लाकडी पालखी बाबांच्या वेळेपासूनची असून ती हरदर्याहून ( मध्य प्रदेश ) श्रीसद्गुरुंच्या धुंडीराज नाईक नामक एका भक्ताने बाबांना बहाल केलेली आहे. पालखी ठेवण्यासाठी खोली राधाकृष्ण आईंच्या सांगण्यावरून बांद्रयाचे भक्त रघुवीर भास्कर उर्फ काकासाहेब पुरंदरे यांनी ती स्वतः तयार केली, त्याबद्दल त्यांना श्रीबाबांनी शिर्डीची मंत्रपुष्पांजली बहाल केली होती.

द्वारकामाईत पालखी ठेवण्याच्या या खोलीच्या अगदी विरुद्ध बाजूस एक लाकडी दार असलेला तबेला आहे त्यात श्रीबाबांचा लाकडी रथ ठेवलेला आहे. या रथाच्या चाकांची उंची कमी असल्याने तो अगदी बैठा वाटतो. या रथाच्या चारही बाजूस चार कळस असून मध्ये उंच डोलारा आहे. उत्सवप्रसंगी काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीत या रथाचा उपयोग केला जातो, तेव्हा हा रथ विविधरंगी विद्युत्‌दीपांनी तो नटविला सजविला जातो. हा रथ इंदूरचे कै. श्री. अवस्थीकाका व श्री. रेगे यांनी बाबांना अर्पण केला. या रथातून बाबांची अगदी पहिली मिरवणूक १९१८ सालच्या गुरुपौर्णिमा उत्सवप्रसंगी काढण्यात आली होती. भक्त गोपाळराव बुट्टी, म्हाळसापती इ. मंडळींनी बाबांना खूपच आग्रह केल्यामुळे बाबांनी मिरवणूक काढण्यास परवानगी दिली. या गुरुपौर्णिमेला तिसरे प्रहरी बाबांची गावातून मोठ्या थाटाने मिरवणूक काढण्यात आली. बाबांच्या समवेत रथात पादुका व तसबीरपण ठेवण्यात आली होती.

या रथाच्या खोलीच्या पुढेच तीन चार पावलावर एक छोटीशी देवळी आहे. या देवळीजवळच एक भगवा ध्वज लावलेला आहे. येथेच बाबा भिंतीला टेकून उभे रहात असत. याची आठवण म्हणून ही जागा दाखविली जाते. या देवळीच्या वरतीच छोट्याशा पादुकांची स्थापना अलिकडेच केलेली आहे.

या देवळीच्या समोरच बाबांची चूल आहे. या तीन दगडाच्या चुलीवर हंडी ठेऊन बाबा भात, गोड भात, शिजवीत असत व तो भक्तांना प्रसाद म्हणून वाटत. हा भात, बाबा हातात पळी, डाऊल यापैकी काहीएक न घेता आपल्या उघड्या हाताने अक्षरशः ढवळीत किंवा वरखाली करीत. बाबा उकळत्या वरणाच्या हंडीत लाकडी पळी ऐवजी आपला हात घालून ते ढवळीत असत असा उल्लेख डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकात आढळतो. बाबांनी असा प्रसाद, अन्न शिजविण्यासाठी उपयोगात आणलेले हंडे समाधी मंदिरातील 'शोकेस' मध्ये ठेवलेले आहेत. या चुली जवळच एक खांब आहे त्याला खुंट असे म्हणतात. बाबा या खांबाला धरूनच उठबस करीत.

देवळी व चूल यांच्या पुढेच आढ्याला टांगलेली एक मोठी पितळी घंटा आहे. ती सकाळी ४ दुपारी ११–३० व रात्री ८–३० वाजता वाजविली जाते. द्वारकामाईतील दक्षिण भिंतीलाही दहा कोनाडे आहेत व त्यावर काळया रंगाच्या उभ्या पट्ट्या ओढलेल्या आहेत. या कोनाड्यातूनही पणत्या लावण्यात येतात. द्वारकामाईतच पणत्या-समयांची अशी ही रोषणाई का करण्यात येते यामागे एक घटना आहे व ती श्रीबाबांच्या जीवनातील एक महत्वाची घटना येथेच घडलेली असल्याने तिचा उल्लेख अवश्य करावासा वाटतो—

भगवान श्री साईबाबांना द्वारकामाईत व त्याचप्रमाणे गावातील इतर देवळांतून दिवे लावणे खूप खूप आवडे. त्यासाठी ते गावातील तेली व वाणी यांच्याकडून तेल मागून आणीत. सुरूवातीला काही दिवस या वेड्या फकीराला तेल्या-वाण्यांनी फुकट तेल दिले. पण हे नित्याचेच होत असल्याचे पाहून त्यांनी बाबांना तेल देण्याचे नाकारले. त्यावर काही एक न बोलता ते द्वारकामाईत परतले. ज्या टमरेलातून ते तेल आणीत असत त्याच टमरेलात त्यांनी थोडे पाणी घालून व ते हलवून घेऊन त्यांनी पिऊन टाकले मग तेच डबडे पाण्याने भरून घेऊन त्या पाण्याने सर्वच्या सर्व पणत्या भरल्या त्यात काकडे घातले आणि मग आगकाडी ओढून ते पेटविले. बाबांचे हे चाळे आजुबाजुचे गावकरी पहातच होते. पणत्यामधून पाणी घालून व त्यात काकडे भिजवून पेटवू पाहणारा माणूस त्यांच्या दृष्टीने अगदी अक्षरशः खुळाच वाटला असता. पण तेला ऐवजी पाणी वापरून या साऱ्या पणत्या पेटल्या इतकेच नव्हेतर त्या रात्रभर जळत राहिल्या तेव्हा मात्र गावकरी मंडळींचा भ्रमनिरास होऊन ते अक्षरशः थक्क झाले व बाबांच्या प्रती नतमस्तक झाले. श्रीबाबांच्या अंगी असलेल्या दिव्य सामर्थ्याचा प्रत्यय अशा प्रकारे दिसून येताच गावकरीच नव्हे तर इतर टिंगलखोर मंडळीही त्यांचे पुढे हात जोडून उभी राहू लागली व आपण केलेल्या अपराधाची त्यांचे पुढे क्षमा मागू लागली. परंतु बाबा परमकृपाळू असल्याने त्यांच्या मनात कुणाच्याही बद्दल राग असा नव्हता त्यामुळे क्षमा करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. पण या घटनेतून एक गोष्ट मात्र चांगली झाली की शिरडीकरांच्या मनात बाबांच्या बद्दल अत्यादर उत्पन्न झाला. श्री बाबांची दिव्यांची आरास करण्याची आवड, हौस ध्यानी घेऊन द्वारकामाईत म्हणजेच त्यांच्या बसण्या–उठण्याच्या या जागेत पणत्या व समया तेवत ठेवतात. द्वारकामाईत दक्षिण व उत्तर भिंतीला मिळून एकंदर २९ पणत्यांचे कोनाडे आहेत.

आता आपण द्वारकामाईतील दुसऱ्या भागाकडे वळू या द्वारकामाईतील रथाचा तबेला व पालखीची खोली यांच्या मधल्या भागाला साक्षात् द्वारकामाई म्हणतात. येथे




श्रीबाबांना समोर बसण्याची विनंती करून चित्रकार शामराव जयकरांनी चितार
श्रीबाबांची ही हुबेहूब छबी.

जाण्यासाठी काळया संगमरवराच्या चार पायऱ्या ओलांडाव्या लागतात. या पायऱ्यांच्या डाव्या व उजव्या अंगास संगमरवरी फरशी असलेले दोन ओटे आहेत. डावीकडील ओट्याच्या कडेला पायऱ्या आहेत. कृष्ण पाषाणाच्या चार पायऱ्या चढून वरती गेले की उजव्या हातास एक दगडी चौरंग दिसून येतो. बाबा आंघोळीसाठी या दगडी चौरंगाचा उपयोग करीत असत. या चौरंगाशेजारीच एका लाकडी नक्षीदार भव्य देव्हाऱ्यात श्रीसाईनाथांचे एक जंगी तैलचित्र ४ फूट उंच व ३ फूट २ इंच रुंद चांदीने मढविलेल्या फ्रेममध्ये एका उच्चासनावर ठेवण्यात आलेले आहे. या देव्हाऱ्यासमोर कमलदलाने वेष्टीलेल्या संगमरवरी पादुका असून पादुकांच्या एका बाजूला तिजोरीवजा दक्षिणा पेटी व दुसऱ्या बाजूला लाकडी कठडा आहे. या कठड्याला टेकून व कठड्यावर एक हात ठेवून बाबा बसत असत. चांदीच्या फ्रेममधले बाबांचे तैलचित्र मुंबईत विलेपारले येथे रहाणारे बाबांचे एक परमभक्त श्री. शामराव रामचंद्र जयकर यांनी बाबांना स्वतः विनंती करून बाबांना आपल्या पुढ्यात बसवून ते चितारलेले आहे. जयकरांनी अगदी अशीच तीन चित्रे चितारली. त्यापैकी बाबांनीच एक हे येथे द्वारकामाईत ठेवण्यास सांगितले. दुसरे असेच हुबेहूब चित्र सध्या पारले येथेच भक्त हरी सीताराम उर्फ काकासाहेब दिक्षित यांच्या वंशजाकडे आहे, व तिसरे भक्त मोरेश्वर प्रधान वंशजाकडे असावे असे म्हणतात. या देव्हाऱ्याच्या जवळच एक काचेचे कपाट आहे व त्यात १६ पायली गव्हाने भरलेले एक पोते ठेवलेले आहे. दर रामनवमीस या पोत्यातील गहू बदलण्यात येतो, व त्या पिठाचा प्रसाद करून भक्तांना वाटला जातो. या काचेच्या कपाटाजवळच एका कोपऱ्यात खुंटयासहित एक दगडी जाते आहे. पूर्वी येथे दोन जाती होती पण सध्या त्यातील एक समाधी मंदिरातील शोकेसमधे ठेवण्यात आलेले आहे. स्वतः बाबा या जात्यांवर गहू दळीत असत. एकदा शिरडीत महामारीची साथ आली होती. त्या साथीत सात माणसे दगावली. पण पुढे बाबांच्या कृपेने जे ओढवलेले संकट होते ते कायमचेच गेले कारण आजसुद्धा आजूबाजूच्या खेड्यात ही अशी साथ फैलावली तरी शिरडीत ती कधीही येत नाही. ज्या वर्षी ही साथ आली त्या वर्षी बाबांनी पोत्यातील गहू सूपात काढून ते स्वतः दळायला सुरवात केली. गावातील काही बायका आपण होऊन त्यांच्या मदतीस आल्या. चौघी जणींनी घाईघाईने जात्याचा खुंटा आपल्या हातात घेतला व दळण संपविले. बाबा स्वतः भाकरी पोळी करीत नसल्यामुळे ते सगळे पीठ आपल्याला मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांनी त्या पिठाचे वाटे करायला सुरुवात करताच बाबांनी ‘ फुकटखाऊ रांडा ’ अशा सारख्या शिव्या देऊन ते पीठ वेशीवर नेऊन टाकायला सांगितले व त्या बायांनी त्याप्रमाणे करताच महामारी थांबली अशी या जात्याच्या मागे घटना आहे.

या जात्याच्या जवळच विविध प्रकारच्या व आकाराच्या बारा पितळी समया, असून त्यातील पाच अखंड तेवत असतात. श्री बाबांचे निर्वाण झाल्यानंतर त्या ज्या पेटविण्यात आल्या आहेत त्या आजतागायत तशाच तेवत आहेत. वरती आढ्याला दोन समया व काचेच्या हंड्या टांगण्यात आलेल्या आहेत.

श्री बाबांच्या जयकरांनी काढलेल्या तैलचित्राच्या समोरच श्रीसाईबाबांची परमसाक्षात् धुनी माई आहे. ही धुनी स्वतः बाबांनी आपल्या हातातला चिमट आपटून त्याकाळी प्रज्वलीत केलेली असून ती आजतागायत अखंड पेटत आहे. येथूनच भक्तांना उदीची प्राप्ती होते. बाबा या धुनीतील विभूती ' उदी ' म्हणून देत असता व त्या उदीच्या योगे भक्तांचे आजार, त्यांच्या मनोकामना इ. पूर्ण करीत असत, बाबा या धुनीसमोरच नित्य बसत असत. श्रीसाईसच्चरितामध्ये बाबांच्या या उदीचा प्रभाव वर्णन करण्यासाठी कै. गोविंदराव दाभोलकर उर्फ हेमाडपंतानी ३३ व ३४ असे दोन पूर्ण अध्याय खर्ची घातले आहेत. एखाद्या अग्निहोत्री ब्राह्मणाप्रमाणे बाबा अग्नीची उपासना करीत असत. त्यांनी स्वतः आपल्या योग सामर्थ्याने हा अग्नी प्रज्वलीत केला व तो अग्निहोत्राप्रमाणे कायम जळत ठेवला आहे. चावलेला विंचू उतरविणे, प्लेगच्या गाठी व ताप नाहीसा करणे, नारूची जखम भरून येणे, पायावर झालेला व्रण बरा होणे इ. चमत्कार बाबांच्या उदीने घडविल्याची उदाहरणे बाबांच्या पोथीत आहेत; व आजही भक्तांना बाबांच्या धुनीतील उदीचा चांगलाच उपयोग होत आहे यात वाद नाही. शिरडीला जाऊन आलेल्या साईभक्ताने त्यांच्या प्रसादासोबत जर उदी दिली नाही तर तो प्रसाद अपूर्ण समजला जातो. खरा प्रसाद हा उदीचाच पण आज या उदीपायी संस्थानला अफाट खर्च येतो. ही धुनी सतत पेटत ठेवण्यासाठी वर्षाकाठी ८०० मण लाकडे लागतात. एक मण लाकडाचा भाव शिरडीस १० रु. आहे. याचे वर्षाकाठी ८००० रु. होतात. लाकडाबरोबर गोवऱ्या पण धुनीत टाकल्या जातात. वर्षाकाठी ३००० पोती गोवऱ्या लागतात. एका पोत्याला सध्या ४ रु. पडतात. तेव्हा लाकडे व गोवऱ्या यांची किंमत २०००० रु. होते. ही लाकडे व गोवऱ्या वाहून आणण्यासाठी वेगळी मजुरी द्यावी लागते. धुनीतून काढलेली उदी चाळण्यासाठी दोन रु. मजुरीवर काम दिले जाते. भक्तांच्या मागणीनुसार ही उदी नीट पोस्टाने पाठविली जाते. या सर्वांपायी वर्षाकाठी १५ हजार रु. खर्च येतो. अशा प्रकारे केवळ उदीसाठी साईबाबा संस्थानला वर्षाकाठी सुमारे चाळीस हजार रु. खर्च येतो पण संस्थान हा सारा खर्च मोठया आनंदाने करते व साई भक्तांना उदीपासून समाधान मिळावे म्हणून सतत प्रयत्नशील राहाते. भक्त उदी कपाळी, डोक्याला, गळयाला, लावतात व अमृततुल्य ती आहे म्हणून जीभेवरही ठेवतात. आकाशात सूर्य, चंद्र तारे असे-



ही आहे श्रीबाबांनी प्रज्वलीत केलेली व आजतागायत अखंड पेटत असलेली धुनीमाई. येथूनच भक्तांना संजीवनी उदीची प्राप्ती होते.

तोपर्यंत बाबांच्या अदृश्य शक्तीद्वारे प्रज्वलीत झालेला हा अग्नी अखंड जळत रहाणार आहे यात शंकाच नाही. बाबांच्या उदीवर भक्तांचा परम विश्वास आहे.

बाबांची हीं धुनी सात फूट लांब व ५ फूट २ इंच रुंदीची आहे. धुनीला लोखंडी जाळीचे दार बसविण्यात आलेले असून लाकडे सर्पण टाकण्यासाठी व सकाळी पुजाविधी करण्यासाठी म्हणून ते उघडले जाते. दररोज दुपारच्या आरतीच्या पूर्वी प्रथम या धुनीमाईची पूजा केली जाते या पूजेला वैश्वदेवाची पूजा–अग्नीदेवतेला होम अर्पण करणे–असे म्हणतात. या अगदी पहिल्या पूजेनंतर समाधी मंदिरातील शोकेस मधील बाबांच्या विविध वस्तूंची पूजा केली जाते आणि मगच समाधी मंदी-

रातील दुपारची १२ वाजताची बाबांची मध्यान्ह आरती होते. या तिन्ही पूजा एकाच पुजाऱ्याने करावयाच्या असतात.

धुनीला लागूनच एक छोटासा ओटा आहे. त्यावर पाण्याने भरलेला एक रांजण त्यावर एक झाकण व पाणी काढण्यासाठी एक दांड्याचे पितळी भांडे व एक दोन प्लॅस्टिकचे उभट पेले ठेवलेले आहेत. भाविक या बाबांच्या रांजणातील पाणी घोटभर पितात व संतोष पावतात. या रांजणाजवळच आणखीन एक मातीचे भांडे आहे. या भांड्याला 'कोळंबा' असे म्हणतात. बाबा गावातून भिक्षा मागून जे काही आणीत ती या कोळंब्यात ठेवली जाई. जेव्हा बाबांना लहर येईल व इच्छा होईल तेव्हा या कोळंब्यातले ते खात. बाकीचे गोरगरीब, भिकारी, किंवा कावळे, कुत्री, मांजरेसुद्धा यातील पदार्थ खात किंवा पळवीत पण बाबा कधीही कुणाला बोलत नसत, रागावत नसत. कित्येकदा बाबा या कोळंब्यात भिक्षा एकत्र करून त्याचा काला करीत व प्रसाद म्हणून तो वाटीत असत. द्वारकामाईत नैवेद्य दाखविताना या कोळंब्यात पोळी-भाकरीचा तुकडा व किंचितसा भात टाकण्याची प्रथा आहे. ही भांडी बाबांच्या वेळेपासूनची जरी नसली तरी ती अधून मधून बदलली जातात.

हा संपूर्ण द्वारकामाईचा दुसरा भाग लोखंडी जाळीने बंद केलेला आहे व त्यावर समोरच्या बाजूस श्रीबाबांनी भक्तांना दिलेली अभयवचने ओवीबद्ध स्वरूपात लिहिलेली आहेत ती अशी—

॥ श्री सद्‌गुरु साईनाथ शरणम मम ॥

शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥
जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तासाठी ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ॥
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥
शरण मज आला आणि वाया गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥
जो जो मज भजे जैशा जैशा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥
जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस । मागे जे जे ज्यास ते ते लाभे ॥
माझा जो जाहला काया वाचा मनी । तयाचा मी ऋणी सर्व काळ ॥
साई म्हणे तोची तोची झाला धन्य । झाला तो अनन्य माझे पायी ॥

याचाच हिंदी अनुवाद फलक जाळीच्या दुसऱ्या बाजूस लावण्यात आला असून दरवाजावर श्री दत्तात्रयाची तसबीर आहे. याशिवाय श्रीनृसिंहसरस्वती, श्री टेंब्येस्वामी, श्री अक्कलकोट स्वामी समर्थ, श्री माणिक प्रभु, श्री जनार्दन स्वामी, श्री गजानन महाराज, पंत बाळेकुंद्रीकर महाराज व श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या भव्य तसबीरी आहेत. एकाकाळी द्वारकामाईचा संपूर्ण सभामंडप विस्तृत व सुव्यवस्थित नव्हता आज १२ लोखंडी खांबावर आधारलेला व वरून संपूर्ण पत्र्यांनी आच्छादलेला हा मंडप भक्त श्री. जहांगिर फ्रामजी दारुवाला यांनी २२०० रु. देणगी देऊन तो आणखीन व्यवस्थित डागडुजी करून घेतला आहे. पण यामागे एक रोमहर्षक घटना आहे ती अशी–

भक्त श्री. जहांगीरजी नौदलात कॅप्टनच्या हुद्द्यावर होते व त्यांच्या हाताखाली बऱ्याचशा नौका होत्या. रुसो-जपानी युद्धाच्या प्रसंगी बहुतेक सर्व त्यांच्या नावा शत्रूने डुबविल्या. फक्त तीनच नावा शिल्लक राहिल्या. पण त्या वाचण्याची शक्यता काही दिसत नव्हती. श्री. दारुवाला आपल्याजवळ बाबांचे एक चित्र नेहमी बाळगत असत. आपल्यावर ओढवलेला बिकट प्रसंग जाणून घेऊन त्यांनी चटकन बाबांचा फोटो बाहेर काढला व त्यास आवर्जून नमस्कार केला व मनोभावे बाबांची करुणा भाकली. आपल्या उरलेल्या तीन नौका तरी वाचविण्याची त्यांनी बाबांना प्रार्थना केली. शिरडीत द्वारकामाईत बसलेल्या बाबांनी त्यांची ही प्रार्थना ऐकली व ते भक्त संकट निवारणार्थ धावून गेले. त्या तीन नौका सुरक्षितपणे किनाऱ्यास लावल्या. इकडे द्वारकामाईत बसलेल्या बाबांची संपूर्ण कफनी व डोक्यास बांधलेले फडके अक्षरशः ओलेचिंब झालेले होते इतके की त्यातून पाणी निथळून छोटेसे तळे द्वारकामाईत त्यावेळी झालेले होते. ही घटना घडल्यावर तिसरे दिवशी दारुवाला यांजकडून बाबांना आभार प्रदर्शनाची तार आली. भारतात परतताच ते प्रथम शिरडीला बाबांच्या दर्शनास आले. पुढे त्यांना नोकरी लागली व सवड होताच त्यांनी मंडपाची अशी संपूर्ण दुरुस्ती करून टाकली.

द्वारकामाईला प्रवेशद्वाराशी एक लाकडी नाममात्र फाटक केलेले असून दररोज सकाळी ४-३० वाजता द्वारकामाई उघडली जाते व प्रथम साफसूफ केली जाते रात्री ९–३० वाजता ती बंद केली जाते. गुरुवारी ती १० वा. बंद होते. द्वारकामाईची संपूर्ण व्यवस्था पण समाधीमंदिराची व्यवस्था पहाणारे श्री. वि. वि. बागवे यांच्याकडे आहे. तिथे दोन सेवेकरी व्यवस्था पहातात. द्वारकामाईच्या फाटकाच्यावर छपरावर दोन निशाणे आहेत. एक निशाण संपूर्ण हिरवे असून त्यावर भक्त दामुअण्णा सावळाराम कासार (रासने) अहमदनगर सन १८९२ असे लिहिलेले आहे तर दुसरे निशाण श्री. नानासाहेब निमोणकर, निमोण जि. नगर यांचे हिरवे–भगवे असे आहे. ही निशाणे दरवर्षी रामनवमीस बदलण्यात येतात. सर्व

उत्सव प्रसंगी ही द्वारकामाई भक्तांनी अक्षरशः तुडुंब भरली जाते. पालखी, रथ इ. पण येथेच सजविले–नटविले जातात. द्वारकामाई हे श्रीबाबांचे साक्षात पॉवर स्टेशन आहे. तिथेच जनरेटर पण आहे व तिथेच डायनामो पण आहे ही गोष्ट सर्व साई-भक्तांनी लक्षात ठेवावी.

श्री बाबांच्या पुजेचा अगदी पहिला मान याच द्वारकामाईत भक्त म्हाळसापतींना लाभला. तत्पूर्वी ते पूजा करून घेत नसत. निमगावजाळीचे श्री. सीतारामजी डेंगळे यांना दुसरी पूजा करण्याची परवानगी मिळाली. त्यानंतर काही दिवसांनी नानासाहेब चांदोरकरांचा धाकटा मुलगा महादेव उर्फ बापू यांचेकडून बाबांनी आपली पूजा करून घेतली व यानंतर मग सर्वांनाच पूजा करण्यास बाबांनी परवानगी दिली.

या द्वारकामाईत श्रीबाबांच्या संगतीत झोपण्याचे पहिले भाग्य म्हाळसापती भगत व तात्याबाबा कोते पाटील यांना मिळाले आहे. साक्षात् द्वारकामाईच्या या दुसऱ्या भागाची लांबी १५ फूट व रुंदी १७ फूट आहे.

द्वारकामाईत शहाबादी फरशीवर एक संगमरवरी कासवाची प्रतिमा बसविण्यात आलेली आहे तिथे बाबांचा लाडका घोडा शामसुंदर हा येऊन उभा रहात असे. कासम नावाच्या एका घोडेदलालाकडून हा घोडा घेतला. त्याचे असे झाले कासमला काही एक मूलबाळ नव्हते. या घोड्याच्या आईच्या पोटात हा घोडा असताना बाबांनी 'पेटका बच्चा मेरे पास लाव' असे सांगितले. गरोदर घोडी बाळंत होताच ते शिंगरू घेऊन तो बाबांजवळ आला व ते त्याने बाबांना भेटीदाखल दिले व याचबरोबर कासमला पण मुलगा झाला व त्यालाही बाबांनी शुभाशिष प्रदान केले. काय ही बाबांची अगाध लीला पहा! बाबांनी स्वतः या घोड्याचे नाव शामसुंदर असे ठेवले. या घोड्याला पशुवैद्यक व जहागिरदार खाजगीवाले यांनी पुढचे दोन पाय टेकून नमस्कार करावयास शिकविले होते. वाजंत्री वाजताच तो थुईथुई नाचत पण असे. बाबा त्यास रोज तूप घातलेले पुरण खावयास घालीत असत. आरती संपल्यावर तो बाबांच्या चरणावर लवून नमस्कार करीत असे, हा कृष्णकुमाईत रंगाचा उमदा घोडा फार प्रेमळ व आज्ञाधारक होता. आरती प्रसंगी त्याच्या दोन्ही बाजूला भक्त उभे राहात. आरती संपल्यावर बाबांनीच उदी लावली म्हणजे तो आनंदाने परते व आपल्या नियोजित स्थानी जाऊन उभा राही. त्यानंतर बाबा भक्तांच्या भ्रुकुटीत दाबून (१७ वी कळा) उदी लावीत व डोक्यावर थापटीत व 'अल्ला भला करेगा' असे म्हणत. उदी लावता लावता बाबा खड्या गोड आवाजात गात– रमते राम आयोजी, आयोजी। उदियांकी गोनिया लावोजी, लावोजी।

अशी आहे ही श्री साईबाबांची द्वारकामाई व तिचे हे दर्शन। ☆

# श्रद्धांजलि



प्रा. द. दि. परचुरे हे ह्या मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून काम करीत होते त्यावेळी त्यांनी ह्या मासिकाच्या बहिरंगात व अंतरंगात पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून ते मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालयात काम करीत होते आणि तेथे त्यांच्या ज्ञानाचा व शिकविण्याच्या पद्धतीचा बराच बोलबाला झाला होता. गणित ह्या विषयाप्रमाणेच मराठी व इंग्रजी वाङ्मय आणि तत्वज्ञान ह्यांचाही त्यांचा गाढ अभ्यास होता. साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार करण्यासाठी ते कीर्तने व प्रवचनेही करीत असत. श्रीसाईबाबांची शिकवणुक मुलांमध्ये पसरावी ह्या उद्देशाने 'मुलांचे साईबाबा' हे श्रीसाईबाबांचे गोष्टीरूप चरित्र त्यांनी प्रथम मराठीत लिहिले व नंतर त्याचे इंग्रजी रूपांतरही केले. ह्या पुस्तकाच्या सोप्या व आकर्षक भाषेमुळे ते मुलांमध्ये फारच लोकप्रिय झालेले आहे आणि त्याची अन्य भारतीय भाषांत भाषांतरे होत आहेत. प्रस्तुत मासिकाच्या इंग्रजी व मराठी अशा दोन स्वतंत्र आवृत्त्या काढण्यासाठी त्यांनी नेटाचे प्रयत्न केले व एप्रिल १९७३ पासून ह्या मासिकाच्या दोन स्वतंत्र आवृत्त्या निघू लागल्या. श्रीसाईबाबांची कीर्ती दूरवर पसरत आहे आणि कलेकलेने वाढणाऱ्या चंद्राप्रमाणे ह्या मासिकांचा खपही सतत वाढत आहे. दि. १–६–१९७३ ला, वयाच्या साठाव्या वर्षी त्यांना हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचे देहावसान झाले. दि. १–६–१९८१ ला येणाऱ्या त्यांच्या आठव्या श्राद्ध दिनी आम्ही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत व त्यांच्या आत्म्यास चिरशांति लाभो अशी श्रीसाईबाबांच्या चरणी प्रार्थना करीत आहोत.

—संपादक

# कोर्ट रिसिव्हर श्री. काकरेसाहेबांचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे कोर्ट रिसिव्हर साहेब श्री. कन्हय्यालालजी हिरालालजी काकरे यांच्या वयाला १० मे १९८१ रोजी साठ वर्षे पूर्ण होऊन त्यांनी एकसष्ठाव्या वर्षी पदार्पण केल्याबद्दल त्यांचे चिरंजीव डॉ. श्री. प्रकाश, श्री. किरण व कन्या सौ. रत्ना छाजेड आणि जामात श्री. रमेशचंद्रजी छाजेड यांनी आयोजित एक कौटुंबिक अभिष्ट चिंतनपर समारंभ शिरडी येथील मंगल कार्यालयात मोठ्या थाटात साजरा केला गेला. या प्रसंगी अध्यक्ष या नात्याने श्री. काकरेसाहेबांचे साडू व पुण्याचे सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. हस्तीमल कुंदनमलजी फिरोदिया हे व प्रमुख पाहुणे म्हणून माजी धर्मादाय आयुक्त श्री. वसंतराव निरगुडे उपस्थित होते. या समारंभाला जोडूनच श्री. काकरेसाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. प्रकाश यांचा चि. सुधा फटालेशी साखरपुडा समारंभही आयोजित करण्यात आला होता.

सकाळी ठीक १० वाजता सनईच्या मंगल सुरावटीत सर्वांचे स्वागत करण्यात आले. सुरुवातीला काकरेसाहेबांचे व्याही श्रीरामपूरचे श्री. झुंबरलालजी बाफना यांनी नवकार मंत्र व मंगलिक प्रदान केले. नंतर वेदशास्त्र संपन्न श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांनी वैदिक आशीर्वाद श्री. काकरेजींना प्रदान केले. त्यानंतर डॉ. प्रकाश काकरे यांनी आयोजित केलेल्या समारंभाची कल्पना व आपल्या भावंडांची त्यामागील भूमिका समजावून सांगितली. वडिलांनी आम्हाला उत्तम शिक्षण देऊन येथवर जे आणून सोडले आहे त्याबद्दल कृतकृत्य होऊन आम्ही हा सत्कार समारंभ योजला असे ते म्हणाले.

यानंतर या समारंभासाठी आलेले काही शुभसंदेश संस्थानचे ऑफिस सुपरिटेंडेंट श्री. द. चिं. पाठकसाहेब यांनी वाचून दाखविले. मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. एन. आय. मखिजानीसाहेब, पुण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. आर. व्ही. मोडक व सौ. प्रेमप्रभा मोडक, ठाण्याचे इनस्पेक्टिंग डिस्ट्रीक्ट जज श्री. एन. एस. मानुधुने, मुंबई सिटी सिव्हिल कोर्टाचे जज्ज श्री. के. एम. जाली-सतगी, श्री. पी. एस. लढे ॲडव्होकेट अमळनेर, श्री. कलूअप्पा कापसे ॲडव्होकेट परभणी, श्री. एम. व्ही. संतानी सुपरिटेंडींग इंजिनियर जायकवाडी प्रकल्प औरंगाबाद, श्री. एच. एस. जैन अहमदाबाद, श्री. काकरे यांचे बालमित्र सर्वश्री बळीराम

गोसावी दैठणा, व्ही. आर. राजवैद्य संपादक संस्थाजगत, एम. एस. वैद्य, रजिस्ट्रार हायकोर्ट, जी. एल. शिवलीकर, जज्ज स्मॉलकॉजेस कोर्ट, पुणे, मुंबईचे प्रख्यात नेत्र वैद्य डॉ. अरुणकुमार शिवलकर, डॉ. एम. के. किर्तीकर, डॉ. व्ही. एस. गाडगीळ नाशिक, डोंगरेसाहेब, पुण्याचे छाजेड परिवार इ. चे संदेश प्रमुख होते.

यानंतर श्री. काकरेसाहेबांचे मेव्हणे श्री. रतनलालजी कोटेचा उर्फ स्वामी श्री. निष्कामभारती यांनी साहेबांची जीवनरेखा सांगितली व त्यानंतर दैनिक मराठवाड्याचे संपादक श्री. अनंतराव भालेराव यांचे भाषण झाले. आपण एका कौटुंबिक जिव्हाळयाच्या मंगल प्रसंगासाठी येथे आलो आहोत असे सांगून श्री. काकरेसाहेबांना त्यांनी दिर्घायुष्य चिंतीले. डॉ. प्रकाश यांच्या मामी सौ. सूरजबेन कोटेचा यांनी छोटेसे भाषण केले व मंगलप्रसंगावर आधारित रचलेली एक कविताही म्हणून



कोर्ट रिसिव्हर श्री. काकरे साहेब यांनी ६१ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांच्या झालेल्या शुभेच्छा समारंभ प्रसंगी माननीय अध्यक्ष श्री. फिरोदिया साहेब सौ. व श्री. काकरे यांचा शाल, श्रीफल व हार घालून सत्कार करताना शेजारी संस्थानचे ऑफिस सुपरिटेंडेंट श्री. द. चिं. पाठक साहेब उभे आहेत.

दाखविली. यानंतर साहेबांचे व्याही श्री. उत्तमचंद छाजेड, शिर्डी–कोपरगाव परिसरातील एक कार्यकर्ते पुढारी श्री. बाबुराव पुरोहित, कोपरगावचे प्रख्यात वकील श्री. पी. डी. गुजराथी, डॉ. किन्हाळे, श्री. नानासाहेब रासने, मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सदस्य डॉ. पुरुषोत्तम दरक, औरंगाबाद, या पाहुण्या मंडळींची श्री. काकरेसाहेबांच्या बद्दलची गुणगौरवपर भाषणे झाली.

श्रीसाईबाबा संस्थान कर्मचारी वर्गातर्फे संस्थानचे मुख्य स्थापत्यशास्त्रज्ञ श्री. डी. सी. पाटील, वैद्यकाधिकारी डॉ. प्र. श्री. देशपांडे, श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर, आर्किटेक्ट श्री. आर. पी. तलगिरीसाहेब, श्री. एल. के. कुंभार व ग्रंथपाल श्री. यामचंद्र उर्फ शिखरचंद्र कासलीवाल यांची श्री. काकरेसाहेबांच्या विषयीची गुणगौरव करणारी, त्यांचे गुणवर्णन व आठवणी सांगणारी अभिष्ट चिंतनपर भाषणे झाली.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. वसंतराव निरगुडेजी आपल्या भाषणात म्हणाले, ' स्वतः श्री. काकरेजी खरोखरीच एक तपस्वी आहेत. नांदेड व नागपूर या दोन्ही ठिकाणी मी त्यांचे कामकाज अतिशय जवळून पाहिलेले आहे. न्यायनिष्ठूर राहूनही पक्षकारांना संतुष्ट करण्याची किमया त्यांचेकडे आहे हे विशेष होय. बुद्धी आणि न्याय यांचा समन्वय साधून समतोलपणा राखून त्यांनी आपले न्यायदानातील कर्तव्यकर्म पार पाडलेले आहे. दावे त्यांचेपुढे नेहमीच शांततेने चालत असत असे सांगून त्यांच्या मुलांनी हा समारंभ घडवून आणला याबद्दल संतोष प्रगट केला.

माननीय श्री. फिरोदियासाहेब आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, १९४४ साली श्री. काकरे यांचा व माझा परिचय झाला व तो पुढे वाढत जाऊन आता आमचे हितसंबंध कौटुंबिक आप्तनातलगापर्यंत जुळले आहेत. अतिशय धीरगंभीर वृत्तीने आपले न्यायदानाचे कार्य श्री. काकरे यांनीं न्यायाधिश कारकिर्दीत केले. आपल्या कर्तव्यपालनात त्यांनी कधीच कामचुकारपणा केला नाही तर तेव्हा काय आणि आता काय अतिशय तत्परतेने ते आपल्यावर सोपविलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आलेले आहेत असे सांगून श्री. काकरेजींना त्यांनी शतायुषी भव असा शुभाशिर्वाद दिला.

यानंतर डॉ. प्रकाश काकरे यांचा साखरपुड्याचा धार्मिकविधी पार पाडण्यात आला. संस्थान गवई श्री. जोशी व श्री. श्रीकृष्ण सुखदेव शर्मा यांनी यथोचित विधी या प्रसंगी केले. डॉ. प्रकाश यांची भावी वधू चि. सौ. कां. सुधा नागनाथ फटाले ही आंबेजोगाई येथील मेडिकल कॉलेजात शेवटच्या एम. बी. बी. एस. ला शिक्षण

घेत आहे. श्री. नागनाथराव फटाले हे दैनिक मराठवाडा वृत्तपत्रात एक अधिकारी पत्रकार असून ते मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर सदस्य आहेत. अखिल महाराष्ट्र हमाल युनियनचेही ते अध्यक्ष आहेत. औरंगाबादचे एक प्रसिद्ध पुढारी म्हणून ते ओळखले जातात.

डॉ. प्रकाश व चि. सुधा यांच्या साखरपुडा कार्यक्रमप्रसंगी उभय पक्षाकडील बरीच व्याही मंडळी हजर होती. विशेषतः श्री. काकरेसाहेबांचे दोन्ही वडील बंधू



कोर्ट रिसिव्हर श्री. काकरे साहेब यांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. प्रकाश व चि. सौ. कां. सुधा नागनाथ फटाले यांच्या साखरपुडा समारंभ प्रसंगी टिपलेले दृश्य. चि. सुधा जवळच श्री. काकरेसाहेब यांची कन्या सौ. रत्ना रमेशचंद्र छाजेड व तिच्या शेजारीच साहेबांचे द्वितीय चिरंजीव श्री. किरण व त्यांचे शेजारी काकरेसाहेबांचे बंधू श्री. सुवालालजी दिसत आहेत. तर डॉ. प्रकाश यांच्या पाठीमागे अगदी टोकाला चि. सुधाच्या मातोश्री दिसत असून इतर व्याही मंडळी आहेत.

(छाया—विलास कुर्टीकर, नगर)

श्री. सुवालालजी व श्री. छगनलालजी हे उभयता हजर होते. तसेच मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्टाचे जज्ज श्री. एन. टी. श्रॉफ साहेब व शिर्डी-कोपरगाव परिसरातील प्रतिष्ठित मंडळीही हजर होती. स्वतः श्री. काकरेसाहेबांनी आपल्या उभय बंधूंचा सत्कार त्यांच्या गळयात पुष्पमाला घालून केला.

आपल्या सत्कार सोहळयास उत्तर देताना श्री. काकरे साहेब म्हणाले, रत्न, प्रकाश, किरण अशी मी माझ्या मुलांची नावे जी ठेवली आहेत ती सहेतूकच आहेत मला संसारात आईची व वडिलांची अशा दोन्ही भूमिका कराव्या लागल्या आहेत माझी मुलं मला आईच समजून सर्व काही सांगतात. जीवनात बरे वाईट प्रसंग सर्वांवर येतात व मजवरही ते आलेले आहेत व मला कामधंदा, नोकरी, उद्योग व्यवसाय, कर्तव्य पालन करून कुटुंबाचे व मुलांचे सर्व प्रश्न सोडवावे लागले आहेत याची जाणीव मुलांना झाली म्हणूनच की काय त्यांनी माझा साठावा वाढदिवस समारंभ कृतज्ञतापूर्वक केला आहे हे सांगताना ते अक्षरशः गहिवरले. केवळ मुलांच्या. प्रेमाखातर आदराबद्दल मी हा समारंभ स्वीकारला आणि या समारंभामुळेच अनेक इष्टमित्र नवे जुने एकत्र आले सर्व आप्तनातलगही आले हा एक दुग्ध शर्करा योगच म्हणायला पाहिजे हे सांगताना त्यांनी आपल्या न्यायालयीन कारकिर्दीतील काही आठवणीही सांगितल्या. शेवटी उपस्थित आमंत्रित मंडळींचे आभार प्रदर्शन झाल्यावर प्रिती भोजनाचा कार्यक्रम तिथेच पार पडला.

संपूर्ण कार्यक्रमाचे संचलन ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. द. चिं. पाठकसाहेब यांनी केले. सकाळी १० वाजता सुरू झालेला हा मंगल समारंभ दुपारी ३ वाजता संपला. श्री. बाकलीवाल व श्री. बाबासाहेब शिंदे यांनी या संपूर्ण समारंभाची उत्कृष्ट व्यवस्था केली होती.

—साईनंद

## कुमार आशिषचा व्रतबंध समारंभ

● साईलीलाचे एक मान्यवर लेखक–कवी श्री. विजय हजारे यांचे चिरंजीव कु. आशिश याचा व्रतबंध समारंभ मंगळवार दि. १९–५–८१ रोजी सकाळी ९-२५ वा. रामबाग, लक्ष्मीनारायण लेन माटुंगा येथे साजरा झाला. बटूस शुभाशिष.

# बाबांची मानसपूजा

चराचरी तू, आवाहन ये काय तुझ्या कामी
सकळाधारा द्यावे तुम्हा काय आसना मी
स्वच्छ जो त्या केले ठरते, अर्घ्य पाद्य वाया
कर वाहीना आचमन तुजला, शुद्धाला द्याया
घालू कैसे तुला निर्मळा, देवा स्नानाते
विश्वंभर तू तुला वाहू मी पट कवण्या हाते
निरालंब तू उपजीताची थोरवी का तूते ?
चंदनाची थोरवी तुजला, नसे लेप ज्याते
गंधाची त्या कशास द्रव्ये, सुगंधी ही तुजसी
धूपारतीच्या प्रसन्न कैसा धूपे तू वेसी
विश्वदीप तू धूप–दीप हे, काय होती तुजसी
भक्तजनांच्या आरतीहरा तू, आरती का घेशी ?
विभो, तृप्त तुज कैसे करावे, म्या तांबुल-दानी
धनेश तू तुज कसली देऊ, दक्षिणेस नाणी.
नसे अनंता प्रदक्षिणेचे बळ माझ्या ठायी
अभंगपद तव मग कैसे म्या, लागावे पायीं
तुजला स्तविता हात टेकले जेथे वेदांनी
कशी टिकावी तेथे माझी, ही बोबडी वाणी !
अनाथ मी लेकरू तुजपुढे, जननीचे नाते
तव सेवेचा ओढा देवा असे मात्र माते
चुकले मुकले शब्द मुलाचे, गोडचि जननीते
बालिश लीला पाहुनी तिच्या, मनीं हर्ष वाटे
होईल तैशी करतो सेवा, गोड करुनि घ्यावी
आत्मपदाची जोड गुरुजी, निजदासा द्यावी.

॥ पावना दत्ता दयाळा, पावना दत्ता, पावना साई दयाळा, पावना साई ॥

—साईसेवक माधव मास्तर
गुरुप्रसाद, कलानगर, बांद्रे-५१

# ओ शिर्डीवाले बाबा

ओ शिरडीवालारे, साईबाबा तेरा प्यारा नाम है।
साईबाबा तेरा प्यारा नाम है। साईनाथा तेरा प्यारा नाम है ॥ ओ ॥
दुःखियों के दुःख हराने वाला
सबकी बीगडी बनानेवाला
द्वारसे तेरे खाली गया ना भक्त तेरा मतवाला रे ॥ ओ शिर्डी ॥
शिरडी नगर की राह सुहानी
समाधिकी है शोभा न्यारी
द्वारकामाई में धूनी लगाई पानी में दीये जलाये रे ॥ ओ ॥
साईनाम है शीतल छाया
जो भी लीया सुख शांति पाया
भक्त हृदयकेवासी बाबा सबको दिया सहारा रे ॥ ओ ॥
भक्तोंके सब काम संवारे
मुजको मत बीसराना रे
जनम जनम से तेरी 'चंदु' तेरा नाम पुकारे रे ॥ ओ ॥

—सौ. चंद्राबेन भाटे,
जयंतव्हिला, रफी अहमद किडवाई मार्ग वडाळा, मुं. १३

# ओवाळणी

कैवारी हा देव
दुजा नाही भाव
आम्ही जिवीताचे जीव तुम्ही द्यावो ओवाळणी ॥धृ॥
पापबुद्धी आम्हा नका दावू डोळा
स्वार्थ मत्सर हेवा नको आम्हा देवा
देवाचा तू देव भक्ताचा कैवारी
ममतेची छाया आम्हा दावी ॥१॥
माझे मन निरंतर चित्त होई पांडुरंग
तुझे रुप सगुण विठ्ठल विठ्ठल ऽऽऽ
माझे मला मीपण नको रे देवा
भक्तांच्या कैवारा सगुण रुप दावा ॥२॥

—श्री. सारंग प. टी. देवगड (रत्नगिरी)

# श्रीसाई परिवार वृत्त विशेष

卐✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱✱卐

## नांदा सौख्य भरे

● भांडूपचे साईभक्त श्री. लाडू लक्ष्मण टेमकर यांची कन्या चंद्रकला हिचा विवाह चि. कृष्णा मयेकर यांचेशी ६–५–८१ रोजी सायं. ५–१५ वा. सत्यविजय को. ऑप हौसिंग सोसायटी हॉल सर्वोदय नगर, भांडूप येथे थाटात साजरा झाला.

× × ×

● चेंबूरचे साईभक्त कै. आत्माराम बापू शृंगारे यांचे चिरंजीव श्री. शिवदत्त यांचा विवाह श्री. वामनराव परब यांची कन्या तनुजा हिजबरोबर ७–४–८१ रोजी दुपारी २–०८ वाजता राजा शिवाजी विद्यालय हायस्कूल हॉल हिंदु कॉलनी दादर येथे साजरा झाला.

× × ×

● साईलीलाचे माजी नामवंत लेखक कै. द. शं. टिपणीस यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. दिलीप यांचा विवाह श्री. रघुनाथ शंकर गुप्ते यांची कन्या मिनाक्षी हिजबरोबर सी. के. पी. हॉल खारकर आळी ठाणे येथे ११-५-८१ रोजी साजरा झाला.

× × ×

● श्री साईबाबा संस्थान शिरडीचे सुरक्षा अधिकारी श्री. एकनाथ चंद्रभान पाटील कोते यांची चतुर्थ कन्या निर्मला हिचा विवाह श्री. गोविंदराव कोकाटे राहणार सई देवगाव याजबरोबर १२–५–८१ रोजी सकाळी ११ वा. साईनाथ मंगल कार्यालय शिरडी येथे साजरा झाला.

× × ×

● इंदूरचे सुप्रसिद्ध साईभक्त व साईलीला मासिकाचे एक लेखक श्री. गजानन कृष्णराव उर्फ बापूसाहेब निरखे याची कनिष्ठ कन्या सीमा हिचा विवाह श्री. विकास विश्वनाथ रिंगे एम. कॉम यांचे बरोबर रवि. ता. १७ मे रोजी सकाळी ९–५१ वा. महाराष्ट्र ब्राह्मण सभा कार्यालय, देवी अहिल्या मार्ग, इंदूर येथें थाटात साजरा झाला. वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी असंख्य मित्रपरिवार हजर होता.

× × ×

● साईभक्त व भारुड आणि सिनेकलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांड-भोर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. दिलीप यांचा विवाह मंगला कावरे हिजबरोबर १७-५-८१ रोजी सायं. ६-५८ वा. संत गाडगे महाराज अकुल धर्मशाळा सोमवार पेठ, पुणे येथे थाटात साजरा झाला.

× × ×

● श्रीसाईबाबा संस्थानचे नवे ग्रंथपाल श्री. यामचंद्र उर्फ शिखरचंद्र कासलीवाल यांचा विवाह निर्मलाकुंवर उर्फ छायादेवी गंगवाल हिजबरोबर १९-५-८१ रोजी सायंकाळी मंगल कार्यालय शिर्डी येथे थाटात पार पडला.

× × ×

● श्रीसाईबाबा संस्थानचे एक कर्मचारी श्री. रामराव शेळके यांचा विवाह द्वारकाबाई तुरकणे हिजबरोबर शुक्र. ता. २१-५-८१ रोजी पिंपळवाडी ता. कोपरगाव येथे सकाळी ११-२१ वा. पार पडला.

× × ×

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी कार्यालयातील जुने वयोवृद्ध कर्मचारी श्री. रामचंद्र बाळकृष्ण उर्फ भाऊसाहेब खोत यांचे चिरंजीव श्री. सतीष यांचा विवाह श्री. मोरेश्वर चापडगावकर यांची कन्या चि. सौ. कां. विमल इजबरोबर मु. चापडगाव, ता. शेवगाव जि. नगर येथे २६-५-८१ रोजीं सकाळी ८-३५ वा. थाटात पार पडला. वधू-वरांना आमच्या शुभेच्छा.

× × ×

पुण्याचे साईभक्त कै. भाऊसाहेब लोंबर यांचे नातू श्री. मदन यांचा विवाह चि. सौ. कां. भारती ढाखवे इजबरोबर २३-५-८१ रोजी सायं. ६-४६ वा. श्रीसद्‌गुरु साईनाथ कृपामठ स्वारगेट येथे पार पडला.

× × ×

# शिरडी-वृत्त माहे एप्रिल सन १९८१

## रामनवमी उत्सव कार्यक्रम

श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज शिरडी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबाद प्रमाणे शनिवार दि. ११-४-८१ ते सोमवार दि. १३-४-८१ पर्यंत तीन दिवस थाटात साजरा झाला. दिवसे दिवस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात वाढत असल्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोई होऊ नये म्हणून संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खाते प्रमुखांची सभा एक महिना अगोदर घेऊन सर्व कामाचा व खर्चाचा विचार विनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर कलाकारांची हजेरी, सनई, चौघडा, वाजंत्री, अन्नदान वगैरेची व्यवस्था ठेवणेत आली होती. उत्सवाचा पहिला दिवस :- शनिवार दि. ११-४-८१ रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधिमंदिरातून गुरुस्थानमार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत श्री. निळूभाऊ ( ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे शिष्य ) जि. नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९ व ९-३० ते ११ वाजे पर्यंत श्री. नाथ नेरळकर रेडिओस्टार औरंगाबाद यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-२० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढणेत आली. मिरवणूकीचेवेळी स्थानिक लोकांनी व भक्त मंडळींनी गारुड भारुड कार्यक्रम केले. पुण्याचे रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी समाधि मंदिरात आली व शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :** रविवार दि. १२-४-८१ रोजी रविवारची सुट्टी व उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे पहाटे पासूनच श्रींच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व साईचरित्र ग्रंथ-वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणु-कीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडी गावातील भाविक मंडळी व बाहेर गावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६-३० वा. मा. श्री. काकरेसाहेब यांनी काव-

डीची पूजा केल्यावर अंदाजे एक हजार कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गावातून आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता.

सकाळी १०-३० ते दुपारी १२-३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले नांदेड यांचे रामजन्म आख्यात कीर्तन झाले. सायंकाळी ४-१५ वा. श्रींच्या निशाणाची व ५ वा. रथाची मिरवणूक गावातून निघाली. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थीत कलाकारानी श्रीच्यापुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्री खुले ठेवले होते. उत्सवाचा तिसरा दिवस : सोमवार दि. १३-४-८१ नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाळकाला कीर्तन सकाळी १०-३० ते १२-३० पर्यंत झाले. दहीहंडी, माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-३० ते ८-४५ पर्यंत श्री. चोबे नागपूर यांचे काव्य गायन झाले. ८-४५ ते १० पर्यंत श्रीमती जयश्री बेलसरे मुंबई याचे गायन झाले त्यानंतर शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

**हवा पाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन :** १) संस्थान गवई ग. वि. जोशी, शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. तुकाराम बुवा आजेगावकर, मु. पो. आजेगाव जि. परभणी

३) ,, अनंतराव आठवले महाराज, नांदेड

४) ,, निळूभाऊ नांदेड, ५) ह. भ. प. आबाजी पणशीकर मुंबई.

५) ,, नानासाहेब रासने पुणे.

**गायन, वादन, भजन, नृत्य वगैरे—**

१) सर्वश्री जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. २) अशोक कदम, मुंबई. ३) मनोहर कदम, मुंबई. ४) देवीबेन नंदकुमार गांधी, अहमदाबाद. ५) ह. भ. प. गोसावीबाबा, नर्मदातीर. ६) पुरुषोत्तम विठ्ठल बावकर, मुंबई. ७) रामदास मारुती खुळे, कल्याण. ८) नाथराव नेरळकर, औरंगाबाद. ९) जयराम गोसावी, १०) शिवराम गोसावी,

११) जयंत नेरळकर १२) अशोक खंदारे, १३) राजाराम दैठणकर, पुणे. १४) सखाराम राघुजी सालकर, कोपरगाव. १५) भोलानाथ समेळ, मुंबई. १६) राजेंद्र सखाराम सालकर, कोपरगाव. १७) शिवराम बिडवे, संगमनेर. १८) पुरुषोत्तम वि. बावकर, मुंबई. १९) अनंत शिरोडकर, मुंबई. २०) रावसाहेब देशमुख अमरावती. २१) विलास विठ्ठलराव चव्हाण, पुणे. २२) सुर्यकांत गिटे, पुणे. २३) पुष्पलता कारखानीस, मुंबई. २४) नंदू वऱ्हाडकर, मुंबई. २५) भास्करराव वऱ्हाडकर, मुंबई. २६) अलका वेळणेकर मुंबई. २७) सौ. कमलताई सांडभोर, पुणे. २८) सौ. संध्या वाडकर, मुंबई. २९) निर्मला बळराम नाईक, ३०) अहमद पठाण लक्ष्मीवाडी ३१) श्यामसुंदर भेडा संगमनेर ३२) देवदास वाडकर, मुंबई. ३३) न्यु राहता भजनमंडळ राहता ३४) रघुनाथ सांडभोर, पुणे. ३५) सय्यद जमादार ३६) सौ. प्रमिलाताई पैटणकर पैटण. ३७) सुमतीबाई गुजराथी, शिर्डी. ३८) विजय पवार, सावळीविहीर. ३९) सौ. सविता सुरेश गिजरे, शिर्डी. ४०) विष्णू भगवंत शेणवी भोले, गोवा. ४१) दौलतभाई शर्मा, मुंबई. ४२) आप्पासाहेब कागे, कोळपेवाडी. ४३) सतिश हेगडे बेळगाव. ४४) रमेश तुकाराम गोडगे. ४५) ज्यादूसिंग ठाकूर, खेडकर तमाशा मंडळ, पुणे. ४६) निवृत्ती शंकर रुपवते, खेडकर तमाशा मंडळ. ४७) बाबूराव तुकाराम कांबळे, खेडकर तमाशा मंडळ. ४८) शिवाजी रामभाऊ पांढरे खेडकर तमाशा मंडळ. ४९) दत्तोबा मराठवाडीकर, चंद्रकांत तमाशा मंडळ. ५०) दत्तोबा चव्हाण, चंद्रकांत ढवळपूरीकर तमाशा मंडळ. ५१) शेकनब उमर पटेल, चंद्रकांत तमाशा मंडळ. ५२) भिमराज धोंडीबा बनसोडे, राकूरी. ५३) पयाजी पंचरात, धामणी ५४) जनार्दन अनंत बाईदंडे चंद्रकांत तमाशा मंडळ. ५५) वसंत नारायण चव्हाण, तुकाराम खेडकर तमाशा मंडळ. ५६) ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, शिर्डी. ५७) बालमभाई पापाभाई राहाता ५८) रामचंद्र पाटील, उसणे. ५९) वसंत दामोदर रासने पुणे ६०) ह. भ. प. तुकाराम बुवा आजेगावकर ६१) ह. भ. प. दामोदर वासुदेव मांडारकवठे ६२) कृष्णकुमार चौबे, नागपूर ६३) श्रीमती जयश्री बेलसेर, मुंबई ६४) प्रमोद लक्ष्मण परकर मुंबई. ६५) वसंत बाळाराम जोशी, मुंबई ६६) यशवंत नाईक मुंबई ६७) दत्ताराम भागोजी कदम मुंबई ६८) सुरेश सिताराम लांजेकर मुंबई ६९) सुरेश सदाशिव हिर्लेकर ७०) सुरेश राजाराम आंजर्लेकर मुंबई. ७१) चंद्रकांत राजाराम चव्हाण मुंबई ७२) शशिकांत एकनाथ दळवी, मुंबई ७३) हरीभाऊ नारायण वारंगे, ७४) राजाराम रोंगाजी नाचणेकर, ७५) वसंत एन कामते, ७६) विलासशेठ पावसकर ७७) विलास महाडीक (पेंटर) ७८) सुखदेव शांताराम नांदवीकर, ७९) शांताराम मिराणे शिर्डी. ८०) रघु-

नाथ सोनार शिर्डी. ८१) मारुती उर्फ बाकूशेठ मांडवकर, ८२) विजय गणपत दळवी, ८३) कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजखाडीकर तमाशा मंडळ पुणे. ८४) विलास बळवंत परळकर, ८५) ह. भ. प. दत्ताराम लक्ष्मण साटले मुंबई. ८६) वसंत महादेव उज्जैन. ८७) ह. भ. प. रामजीबाबा भजनी मंडळ, मोरशी. ८८) डॉ. नटराज रामकृष्ण ८९) विद्या ९०) बी. बी. रेड्डी, ९१) डॉ. एस. सिंग, ९२) बेबी योगीता ९३) बी. बी. बलराम मद्रास. ९४) सौ. शांताबाई भोसले मुंबई. ९५) सौ. कांताबाई कदम ९६) फकिरा कांबळे मुंबई. ९७) प्रकाश कासोर, ९८) हरीश चौरे ९९) हिरालाल बेला, खडकपूर.

## श्रीसाईलीला

### येत्या विजयादशमीचा अंक

### खास बाल साहित्य विशेषांक

आमच्या छोट्या वाचक बंधू–भगिनींनी आपापले बाबांच्या विषयीचे लेख, कविता, अनुभव किंवा शिरडी, मी बाबांची भक्ती कशी करतो, साईबाबांबद्दल आपणास काय वाटते इ. विषयक लेख १ ऑगष्ट १९८१ पूर्वीच संपादक साईलीला साईनिकेतन ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०० ०१४ येथे पाठवावेत. लेख पाठविणाऱ्या मुला मुलींची वयोमर्यादा १६ वर्षा पर्यंत. लेख कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत.